
# 'कल्पना यशवंत ढाले' ह्यांची - दुर्मिळ डायरी

संपादन- दया पवार



# कल्लपा यशवंत ढाले ह्यांची दुर्मिळ डायरी

संपादन

दया पवार

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

प्रकाशक:

सचिव,

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**
मंत्रालय, मुंबई ४०००३२

**मूल्य : रुपये** १०—००

सर्व हक्क : प्रकाशकाधीन

**मुद्रक**:
**सौ. कांता जयसिंग नलावडे**
शिल्पा आर्टस,
सी/ ४ दीप अपार्टमेंट
छेडा नगर मुंबई —८९

## अनुक्रमणिका

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने हाती घेतलेल्या विविध साहित्य विषयक कार्यक्रमांतर्गत अनेक विषयावरील पुस्तके प्रकाशित केली आहेत. विज्ञान, इतिहास, प्राचीन भारतीय संस्कृती, कला व साहित्य इत्यादी विषयावरील अनेक पुस्तके प्रकाशित करून मराठी भाषिकांना उपलब्ध करून दिली आहेत. अप्रकाशित साहित्याच्या प्रकाशनातही मंडळाने लक्ष घातले आहे. मंडळातर्फे प्रकाशित करण्यात येणाऱ्या कलप्पा यशवंत ढाले यांनी लिहिलेली दैनंदिनी या प्रकारात येईल.या दैनंदिनीचे काही भाग आता उपलब्ध झाले असून ते मंडळ पुस्तक रुपाने प्रकाशित करीत आहे. कै. ढाले हे दलित होते. ज्या काळात दलितांना शिक्षण घेण्यात अनेक अडचणी होत्या त्या काळात कै. ढाले यांनी महत्प्रयासाने शिक्षण घेतले. त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीत आलेल्या कौटुंबिक अडचणींची थोडीफार नोंद जरी या दैनंदिनीत असली तरी सर्वसाधारण दलित समाजाची त्याकाळी काय स्थिती होती हे कळण्यास सहाय्य होईल. आजच्या युगातही दैनंदिनी लिहिण्याची सवय दिसून येत नाही. ती सवय कै. ढाले यांनी सुमारे ७५ वर्षापूर्वी अंगीकारलेली होती. कै. ढाले यांच्या या दैनंदिनीत अनेक नोंदी अशा आहेत की ज्या आजही सर्वच समाजातील लोकांना मार्गदर्शक ठराव्यात. हे लक्षात घेऊन कै. ढाले यांची अप्रकाशित दैनंदिनी वाचकांना सादर करण्याचे मंडळाने ठरविले.

मंडाळाचे माजी सदस्य, श्री. दया पवार यांनी ही दैनंदिनी मंडळास उपलब्ध करून दिली तसेच तिचे संपादनही त्यांनीच केले. पुस्तकाची प्रस्तावनाही त्यांनीच लिहिली. या सर्व गोष्टींबद्दल मंडळाच्या वतीने मी त्यांचा आभारी आहे.

**सुरेंद्र बारलिंगे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

४२, यशोधन
मुंबई – ४०० ०२०
दिनांक १ ऑगस्ट, १९८५.

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


निवेदन ........ ४

डायरीच्या निमित्ताने : ........ ६

डायरीचा प्रवास........ ९

भाग २ रा........ २०

भाग ३ रा........ २१

भाग ४ था ........ २२

भाग ५ वा ........ २३

भाग ६ वा ........ २४

भाग ७ वा ........ २५

भाग ८ वा ........ २६

भाग ९ वा ........ २८

भाग १० वा ........ ३०

भाग ११ वा ........ ३१

भाग १२ वा ........ ३२

भाग १३ वा ........ ४०

भाग १४ वा ........ ४३

भाग १५ वा ........ ४७

भाग १६ वा ........ ४९

# डायरीच्या निमित्ताने :—

१९११ ते १९२४ सालात लिहिलेली ही डायरी. सत्तर ऐशी वर्षापूर्वी दलित समाजातील एखादा माणूस डायरी ठेवत होता आणि त्याचे नातेवाईक हा ठेवा मोहरांचा हंडा जपून ठेवावा तसा जपून ठेवत आहेत; ह्याचेच खरे अप्रूप. आता ह्या डायरींतील पाने खूपच जीर्ण झालीत. काळाच्या गर्तेत उद्या ती नाहिशीही होतील.

गोरेगाव (मुंबई) येथे रहात असलेले श्री. डी. के. दोडामणी ह्यांच्या वडिलांची ही डायरी. सद्या ते रेल्वेत हेड टी. इ. आहेत. काही भाग मराठीत लिहिलेला व बाकीचा सर्वच मजकूर लफ्फेदार मोडीत. सत्तर ऐशी वर्षापूर्वीचा दलित समाज, त्याची जगण्यासाठी चाललेली धडपड, त्याचे आचार, विचार, शिक्षण प्रबोधनाची चळवळ यामुळे त्यांच्या इच्छा आकांक्षेला फुटलेले पंख ह्याचे वास्तव दर्शन डायरीच्या पानापानातून होते.

श्री. डी. के. दोडामणी ह्यांनी आपल्या वडिलांसंबंधी सांगितलेली माहिती अशीं— कल्लप्पा यशवंत ढाले ह्यांचे मुळगाव जत, जि. सांगली, जत हे संस्थान असल्यामुळे तेथील रहिवाशाना ब्रिटीशांच्या हद्दीत म्हणजे उरलेल्या भारताच्या भागात त्याकाळी सरकारी नोकरी मिळायची नाही. महार जातींत जन्माला आल्यामुळे जत संस्थानात श्री. ढाले ह्यांना नोकरी मिळण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे श्री. ढाले हे १९३० साली मु. कोकटनूर ता. अथर्नी जि. बेळगाव येथील महार वतनदार श्री. यल्लप्पा दोडामणी यांच्या घरी दत्तक गेले. तेव्हा पासून ढालेचे दोडामणी झाले.

दोडामणी याचा अर्थ कानडी भाषेत 'मोठे घर' असा सांगितला जातो. पण श्री. ढाले ह्यांची डायरी वाचलीं तर मोठे घर पोकळ वासे असेच दृष्य दिसते. भोगलेल्या दारिद्र्याचे काळीज पिळवटून जाईल असे वर्णन त्यात आलेले आहे. शिक्षण घेण्याकरिता श्री. ढाले ह्यांनी कमालीचे कष्ट घेतलेले दिसतात. समाजात मान्यता पावलेली माणसे झळकताना दिसतात पण ढालेसारखी कितीतरी अज्ञात माणसे ह्या भूमीने गिळंकृत केलेली आहेत.

आपण वकील व्हावे हे ढालेंचे स्वप्न होते. विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहवास ढाले ह्यांना मिळालेला. शिक्षणासाठी अमेरिकेत जावे असेही ढाले ह्यांना वाटत होते.

लेखी परीक्षेत आपणास जादा मार्क मिळतात पण तोंडी परीक्षेत तेवढे मार्क घेता येत नाहीत हे त्यांचे डायरीतील वाक्य त्या काळच्या सांस्कृतिक मूल्य कल्पनेवर झगझगीत प्रकाश पाडते. आयुष्याच्या उभारीत त्यांना जसा सवर्ण मंडळीने हातभार लावला तसाच बेळगावसारख्या शहरात खाजगी घराची सबब पुढे करून शिकवणीसाठी महार म्हणून त्यांची बाट धरली जात होती, सबब घरात प्रवेश नव्हता. त्यामुळे शिकता येत नव्हते ह्याचीही प्रखर जाणीव होते.

महाभारतातच काही द्रोणाचार्य आणि एकलव्य नव्हते तर विसाव्या शतकापर्यंत ही परंपरा चालत आलेली. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा त्यांच्यावर नकळत परिणाम झाला असावा. देवाला जर इंद्रीय असेल तर मग माणसात आणि देवात फरक काय असा विद्रोही प्रश्न त्यामुळेच विचारू शकतात पण त्यांचा हा विद्रोह पुढे पुढे समाज परिस्थितीच्या रेट्यामुळे हरलेले दिसतो. आपल्या आयुष्याचे अधुरे

अनुक्रमणिका

स्वप्न त्यांनी वाऱ्यावर सोडून महिना चाळीस रुपये पगारावर त्यांनी डीस्ट्रीक्ट लोकल बोर्डात शिक्षक म्हणून नोकरी धरलेली दिसते.

दलित समाजाचे विदारक दर्शन लिहिताना ते कुठेही कचरले नाहीत जातीची बदनामी होते असा पांढरपेशी विचार त्यांना स्पर्श करू शकत नाही. त्या काळात अस्पृश्य मुलांकरिता वेगळ्या शाळा होत्या. शिकविण्यासही अस्पृश्य मास्तर. उच्चवर्णीय शाळा तपासणीस आला तर दूरूनच मुलांच्या पाट्या पहात. ह्या वातावरणातही ढाले ह्यांची शिक्षण घेण्याची तळमळ दिसून येते.

जातीयतेच्या विषारी इंगळ्या डसूनही त्यांची जीवन निष्टा मालवलेली दिसत नाही. किंवा कडवट होत नाहीत. मारवाडी मंडळी मुलांसाठी दुष्काळात फुटाणे वाटीत. सर्वा ठायीं परमेश्वर मानणारा भक्त फक्त सवर्ण मुलांचीच भुक दुष्काळात भागवीत होते. अशा वेळी ढाले ह्यांनी भुकेपायी फुटाणे चोरले तर त्यांना कोंबड्याच्या खुराड्यात कोंडण्यात आले आणि गेटावरच्या नायकाने महाराच्या दांडग्या मुलास हे काम सांगितले. सवर्ण मारण्यासाठी सवर्ण हात कसा लावणार? साधा गूळ खाण्यास मिळावा म्हणून गूळ चिकटलेली पोती धुण्याचे काम केले. चिकटलेला गूळ तरी खाण्यास मिळेल ह्या आशेने हे काम लहान वयातींल कल्लप्पाने केले.

समाज व्यवस्थेमुळेच आपले शोषण होत आहे याचे भान ढाले ह्यांना होते. साधे शेतातले कणीस घेतले म्हणून ढाले आणि त्यांचे वडींल ह्यांना बेदम मारण्यात आले. ब्राह्मण कारकुनाने महारकींचे काम केले असताना सुद्धा वडींलांचे खाडे मांडले. त्यामुळे सरकारीं काम बुडविले म्हणून १२ रुपये त्याला घरावर सरकारी वसूली आली. १२ रुपयेही भरण्यास नसल्यामुळे त्यांच्या घराचा लिलाव पुकारला. आईच्या अंगावरचा एकुलता एक दागिना गहाण ठेवून रुपय चुकते केले तेव्हा कुठे घराचा लिलाव थांबला. हे सारं सांगताना ढाले कुठेही आक्रस्ताळी झाले नाहीत. अतिशय थंडपणे हे सत्य सांगतात. त्यामुळे वाचक हादरून गेला नाहीं तरच नवल!

डायरीतील साराच अनुभव हा धक्का देणारा. दलितातील विसंगतीं, भांडणे कर्जबाजारीपणा अभावग्रस्त समाजात जन्माला आल्यामुळे घरातील चिडचीड हे ढाले यांनी आडपडदा न ठेवता मांडले आहे. आपले जीच्याशी लग्न झाले ती पाच वर्षाची आहे बरे झाले. बायको लहान आहे त्यामुळे अभ्यास करता येईल किंवा बोर्डींगात वश्याट खायला मिळत नाही त्यामुळे केवळ मटण खाण्यासाठी बोर्डींग मधून पळून जाणे इ. गोष्टी मिस्कीलपणे त्यानी नोंदवल्या आहेत. गेल्या ९० वर्षात बदलत जाणारा दलित समाज त्यातींल चड उतार, मूठभरच लोक भौतिक दृष्टीने समृद्ध झालेत पण बाकीचा समाज आजही गुहा जीवन जगतो ह्याचीच आठवण ही डायरी वाचताना होत असते. दलिताच्या आजच्या तरुणांची मानसिकता आणि त्या वेळचा कल्लप्पा सारख्या संवेदनाशील तरुणाची मानसिकता ही तपासणे हाही पैलू ह्या डायरीला आहे. दिल्लीतला एखादा सवर्ण खासदार महिना एक रुपयाची मनीऑर्डर पाठवितो किंवा एखादा सवर्ण एखादे अभ्यासाचे पुस्तक भेट देतो त्या संदर्भात उपकाराच्या ओझ्याने कल्लप्पा वाकलेले दिसतात. त्यांचे आभार मानावयास कल्लप्पा विसरत नाहीत.

आज दलित साहित्य चळवळीस विशेष सामर्थ्य मराठीत प्राप्त झाले आहे. अनेक दलित लेखक, कवींचे लेखन विद्यापीठीय स्तरावर अभ्यासक्रमाला लावले गेले आहे. दलित साहित्यातील 'आत्मचरित्र' हे समृद्ध दालन समजले जाते. ह्या दालनाची कुळी जाळी शोधण्यास ह्या डायरीची मोलाची मदत होणार

अनुक्रमणिका

आहे. दलित साहित्य नेमके कुणापासून सुरू झाले ह्या वादावरही ह्या डायरीमुळे नवा प्रकाश पडेल. किसन फागूजी बनसोडे, पंडीत कोंडाराम जानबा कांबळे ह्या आद्य लेखकांच्या यादीत कल्लप्पा यशवंत ढाले ह्यांचीही इतिहासाला नोंद घ्यावी लागेल.

एवढ्या वर्षानी का होईना एक साहित्यातून पुसला गेलेला नवा चेहरा आज उजेडात येतो आहे. त्यांच्या डायरीतील भाषा, म्हणी, वाक्प्रचार हे मराठी भाषेचे शुद्ध स्वरुप म्हणूनही संशोधकांना विचार करायला लावील ह्या बद्दल शंका वाटत नाही. 'पूर्वा' मासिकाचे संपादक दिनकर साक्रीकर आणि श्री. वसंत मून ह्यांनी मोलाचे सहकार्य केले ह्याबद्दल मःनपूर्वक आभार!

— **दया पवार**

2 D 'स्वरूप'
सुभाष नगर, गोरेगाव (पूर्व)
मुंबई—४०० ०६३

अनुक्रमणिका

# डायरीचा प्रवास

माझ्या वडिलांच्या ऐतिहातिक डायरीची पहिली आवृत्ती आपल्या हाती देताना मला फार आनंद होत आहे. त्यांची डायरी हेच मुळी विचारपूर्वक टाकलेले पाऊल आहे. साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक चळवळींत पुरोगामी विचाराना उचलून धरणारी ही डायरी मला कशी मिळाली. हे दोन शब्द लिहिताना माझ्या छप्पन्न वर्षांच्या जीवनाचा येथे उल्लेख करणे फारच आवश्यक आहे. कारण या काळात डायरी माझ्याबरोबर आहे. तालुका आथनी मुक्कामी वडील मामलेदार कचेरींत कारकून असताना १५ एप्रिल १९२८ साली माझा जन्म झाला. १९३० साली वडिलांची बदली बेळगावच्या मामलेदार कचेरीत झाल्यावर ही डायरी ते बेळगावला घेऊन गेले. बेळगावला ते आजारी पडले. आथनीस येण्यास निघाल्यावर वाटेत जास्त झाले म्हणून ते शेडबाळ येथे नातेवाईकांकडे उतरले. ऑगस्ट महिन्याचे पावसाळी दिवस, थंडगार वारा अशा परिस्थितीत माझे वडिल तीन-चार दिवस शेडबाळ येथे राहिले. सोबत त्यांची बहिण साऊबाई आणि तिचा बारा-तेरा वर्षांचा मुलगा बाळकृष्ण, वडिलांची आई कृष्णाबाई, पत्नी ताराबाई, तीन वर्षाचा मी व बहिण शकुंतला सहा महिन्याची असे कुटुंब होते. आजार वाढल्यामुळे प्रकृती चिकित्सेसाठी वडिलांना मिरज हॉस्पिटलमध्ये नेले.

दुर्दैवाने २६ ऑगस्ट १९३१ साली वडील वारले. त्यांनी बरोबर आणलेले सर्व सामान शेडबाळच्या नातेवाईकाच्या घरीच होते. सामानाच्या पेटीत ही डायरी होती. वडील वारले असताना दैनंदिनी कोण सांभाळणार? घरातले सगळेच अशिक्षित. छोट्या कुटुंबावर डोंगर कोसळला. ऑगस्ट महिन्याचा पाऊस या कुटुंबाच्या डोळ्यांच्या धारा होऊन धरतीवर पडला. माझी आई घराबाहेर कधी गेली नव्हती तीन मुले गेल्यावर बऱ्याच नवसासायासांनी मी जन्माला आलो होतो.

गेल्या पंधरा वर्षात वडिलांच्या तीन बहिणी, एक भाऊ व वडिलांचे वडील (आजोबा) मरण पावले. आणि आता कुठे संसार बहरत आहे असे वाटत असतानाच वडिलांचे निधन झाले. नुकतेच उमलत असलेले फुल कुणीतरी तोडून त्याचा चोळामोळा करावा तसेच वडिलांच्या निधनाने आमच्या कुटुंबाचे झाले. काळेभोर पाण्याने भरलेल्या ढगांना जोराने आलेल्या वाऱ्याने मिरज शहरावर असे थांबवले की, सूर्य बाहेर आलाच नाही. घरचा सूर्य प्रकाश नाहिसा झाल्यावर घरातील माणसाना आधार कुठून मिळणार? कुटुंब उघडे पडले. पावसा—वाऱ्यानं वडिलांचा देह अंतिम संस्कार करण्याकरीता आथनीस मोटारीने आणला. ही दैनंदिनी शेंडबाळात सामानाच्या पेटीत होती. ह्या दैनंदिनीला काय माहित की, माझी पाने एक दिवस छापली जाणार आहेत. वडील आथनीस असताना एक घर आथनीत आणि एक घर कोक्कटनूरांत बांधले होते. जत्तेचे नाते आथनी मड्डी (चलवादी) घराण्यात होते. म्हणून माझ्या वडीलांचा देह आथनीला आणला आणि अंतिम कार्य केले. बरेच महिने झाल्यानंतर दुःखाचा विसर पडल्यानंतर शेंडबाळहून सर्व सामान आणले. त्या पेटीत ही दैनंदिनी होती. आणि हा वारसा आथनीला पोहचला. घरी कोणी शिकलेले नव्हते. मड्ड्यावरचे घराणे—जोगतीनचे घराणे—कानडी बोलणारे, माझ्या वडिलांनी काय कोठे लिहून ठेवले आहे ते कोणालाच माहित नव्हते. तेवढ्यात वडिलांचे दत्तक बाप यल्लप्पा यांनी माझ्या आईवर खोटे दत्तक म्हणून खटला केला. वडील वारल्याचे दुःख, दत्तक खटला व घरात उदरनिर्वाहाला काही नाही. उदरनिर्वाहासाठी घरातले सर्व सामान हळूहळू विकले गेले. दत्तक खटला यल्लप्पा हयात असे पर्यंत चालला. त्यानंतर कोक्कटनूरचे समस्त महारांनीही दत्तक जमीन म्हारकीची जमीन आहे, पाळी (बलूत) चा हक्क आहे. या कारणास्तव १९४५ साली खटला भरला. तो १९६५ पर्यंत सर्व कोर्टात चालून आमच्या बाजूने निकाल लागला. खटल्याचा खर्च, घरचा खर्च यामुळे अक्षरशः आम्ही वाटेवर पडलो. काही वेळा कोक्कटनूर

अनुक्रमणिका

महारांनी मला ठार मारण्याचा प्रयत्न केला. माझ्या आईला कोक्कटनूरहून हाकालण्याचा प्रयत्न केला. बलुत कामाकरीता मेलेली जनावरे ओढणे, प्रेत देह राखणे इत्यादी बलुत कामे पाळीने करून न घेता सोळा आणे हीस्सेदारीने करून घेऊन फार त्रास दिला. कोक्कटनूर गाव नऊ कसब्याचे, देसगती जमीन, यल्लम्मा देवीचे मुख्य ठाण, मातंग्गेची पूजा आमच्या घराण्याला होती. गाव चाकरी म्हणून ६४ एकर जमीनीची इनामदारी या घराण्याला होती. हे महाराना व दत्तक नातेवाईकांना बघवले नाही. म्हणून त्यांनी आईला आणि आम्हाला घराच्या बाहेर काढले. आईला अन्यायाला, संकटाना तोंड देण्यासाठी बोर्डींगच्या मुलाना जेवण बनवण्याची नोकरी करावी लागली. आई त्रासाला वैतागून कधी आथनी, कोक्कटनूर, वाडी, जत, बेळगांव, धारवाड, माहेरी (शिरनांदगी) व मुंबई येथील सर्व नातेवाईकांकडे आसरा मिळण्याकरिता फिरली पण कोणी मदत केली नाही.

ही दैनंदिनी सामानाच्या पेटीत होती. मी अथनी, बेळगांव, विजापूर येथील शाळांमधून शिक्षण घेत मॅट्रीकला येऊन पोहोचलो. काही वेळा सामान काढताना माझ्या हाती ही दैनंदिनी लागली होती. कानडी शिक्षण असल्यामुळे माझे मराठी मोडके तोडके. ही डायरी वाचताना माझी आजी व आत्या साऊबाई म्हणायच्या ह्या डायरीनेच तुझ्या बापाचा घात केला आहे स्हणून त्या दैनंदिनी फेकून द्यायच्या. ही दैनंदिनी कुठल्या सामानात होती हे मला बरोबर आठवत नाही. मी मॅट्रीक पास झालो आणि माझे लग्न सोलापूर येथील सातपुते घराण्यातल्या मुलीशी झाले. खाजगी भांडणाचे निमित्त करून मड्ड्यावरच्या लोकानी आमच्या घरातून आम्हाला बाहेर काढले. आम्ही चांभाराच्या घरात भाड्याने राहिलो मड्ड्यावरच्या लोकानी सामानाची पेटी दिली नाही. त्या लोकांनी वडिलांची पुस्तके, वह्या विकल्या तरी देखिल डायरी सलामत होती, हेच आश्चर्य आहे. सन १९५७ साली नेवल डॉकमध्ये मला नोकरी लागली आणि भांडूप नेव्हल कॉलनीत राहायला आलो. यावेळी आजी कृष्णाबाई, आत्या साऊबाई आणि आत्याचा मुलगा बाळकृष्ण वारले होते. मी माझ्या पत्नीला व आईला घेऊन मुंबईत रहात होतो व बहिण शकुंतलाचे लग्न झाले होते. खाजगी भांडणे मिटल्यावर सामानाची पेटी मुंबईस आणली तर ही डायरी पेटीत होती. माझे लक्ष त्या डायरीकडे नव्हते. माझी पत्नी सौ. नंदादेवी ही मराठी सातवी पास होती, म्हणून ती अधून मधून ही डायरी वाचत होती. तिने डायरी काढून आपल्या पेटीत ठेवली.

१९६० साली नेव्हल डॉक सोडून रेल्वेत मी नोकरी पत्करली. उदयपूरला कोर्ससाठी एक वर्ष गेल्यानंतर सौ. नंदादेवी डायरी सोलापूरला घेऊन गेली. रेल्वेत नेमणूक झाल्यावर घर बदली करताना गोरेगाव, वडाळा, दादर, अंधेरी अशी माझी पत्नी ही डायरी बरोबर फिरवत होती. सध्याच्या घरात १९६४ साली आलो. एके दिवशी नातेवाईक श्री. दया पवार आमचेकडे आले. त्यांनी ही डायरी वाचली आणि माझ्या पत्नीस म्हणाले, 'मराठीत भाषांतर करा.' त्यांच्या म्हणण्याप्रमाणे डायरी सोलापूरला घेऊन गेलो आणि नातेवाईक श्री. भगवान शींगे गुरुजी (जत) आणि नातेवाईक भाऊसाहेब सातपुते (सोलापूर) या दोघांनी मिळून बराच प्रयत्न, त्रास घेऊन डायरी मराठीत लिहून काढली. मराठीत भाषांतर केलेला दैनंदिनीचा काही भाग श्री. दया पवार यांनी 'पूर्वा' मासिकामध्ये छापला आणि प्रयत्न करून महाराष्ट्र सरकारकडे छापण्यास दिला. असो. या दैनंदिनीविषयी छापताना मला अत्यानंद होत आहे.

या आवृत्तीच्या निमित्ताने पाहिलेल्या व माहिती दिलेल्या माझ्या आईस धन्यवाद व साष्टांग नमस्कार. श्री. दया पवार, श्री. बॅरिस्टर S.N. माने (कोल्हापूर) आणि राजाराम हायस्कूल (कोल्हापूर) हेडमास्तर श्री. पाटील आणि भाऊसाहेब सातपुते (सोलापूर), भगवान शिंगे (सोलापूर), मुद्रक व प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, त्यांचे ऋण आभाराने फिटणार नाहीत.

## अनुक्रमणिका

— **डि. के. दोडामनी (ढाले)**

६७/५३६, सिद्धार्थ नगर,
आदर्श विद्यालय जवळ
गोरेगाव (वेस्ट) मुंबई— ४०० ०६२

# अनुक्रमणिका

**S. N. MANE**

B. A. Bar-at-Law Member of
Constituent Assembely.
Ex Member M. P. S C X. Ex minister of
Kolhapur State.

37/38 Ahilya
Jawahar Nagar
Kolhapur

Ref. No,

Date 9-3-66

माझे जुने मित्र आणि अस्पृश्य समाजाचे अत्यंतिक तळमळीचे होत कार्यकर्ते श्री कलेश्वर यशवंत ढाले यांचे म्हणजेच नंतरचे त्यांचे हल्लीचे दत्तक नाव कलप्पा यलप्पा दोडमणी यांचा अल्प परिचय देत आहे.

ते मराठी मुलकी झाल्या नंतर त्यांचा आणि माझा कोल्हापुरांत परीचय झाला. आणि पुढे त्यांचा मृत्यू सन १९३१ होई परेत ते माझे जिव्हाळ्याचे मित्र होते. पुढे ते मामलेदार कचेरीत तालुका अथणी जिल्हा बेळगाव कारकून असताना अथणी तालुक्यातील कोकटनूर या गावच्या महार इनामदार यलप्पाला दत्तक गेले ते सन १९२६ साल होय, दत्तक बापाचे दोडमणि हे नाव धारण केले. पुढे त्यांची बदली बेळगाव मामलेदार कचेरीत झाली, ते बेळगावला असताना रावसाहेब पापण्णा यांनी हरिजनाच्या मुलांचे बोर्डिंग १९३० साली काढले त्यांचे मुख्य चालक हेच होते. हरीजन मुला करीता सतत मदत करून त्यांना शिक्षण देण्या करीता धडपड करीत होते

अनुक्रमणिका

त्यांना त्यांच्या मृत्यू समयी दोन मुले होती
ती आज हयात आहेत. त्यांची नावे दुडप्पा
उर्फ दयानंद व शकुंतला असे आहे. मुलगा
दयानंद. म. दोडमणि मुंबई वेस्टर्न रेल्वे मध्ये
जवळ २५ वर्षे सर्विस करीत आहे. हल्ली ते राजधानी
एक्सप्रेस चे ट्रेन कंडक्टर (स्टीवर्ड) काम करीत,
तसेच ते देखील समाजाचे काम करतात

Kolhapur
1-3-85

डॉ. एम. एन. मोने
([illegible])

## RAJARAM HIGH SCHOOL

*Juna Rajawada, Kolhawr*

This is to certify that Shri/~~Kum.~~ Dhale Kallappa yashawant

~~is/has been~~/was/~~had been~~ a bonafide student from this School during the years from 1st July 1915 to —

in Std. Vth.

His conduct is good bears a good moral character

The Date of his birth as recorded in the General Register of this School at Sr. No. 2421

is 15·7·1898 (Fifteenth July Eighteen hundred Ninety eight)

caste — Mahar

Place :- KOLHAPUR.


Date :- 1-3-1985

Head Master,

RAJARAM (MAIN) HIGH SCHOOL

KOLHAPUR.

अनुक्रमणिका



श्री. ढाले ह्यांचे मोडी अक्षर

अनुक्रमणिका

असं म्हटल्या वाचून मला राहावत नाही
असो ईश्वरभजी ता. ८-७-७१
(ह. कोणाची)


Dhale

मी ईश्वरांपासून माझ्या जात असल्यामुळे माझ्या मनामध्यें जो काय ईश्वरा विषयी उपदेश झाला आहे त्यास अनुसरून मी आजपासून ईश्वर-प्रार्थना करण्याचे मनावर घेतलें आहे.

परमेश्वर!! ~~(या जगात देवास विसरून~~ आपणां सर्वांस ज्याने उत्पन्न केले आहे, व ह्या जगावर नानाविध प्राणी, डोंगर, समुद्र, झाडे झुडपें, व इत्यादि व सूर्य, चंद्र, चांदण्या वगैरे ज्याने उत्पन्न केलें आहे आणि आम्हां ज्याने बुद्धि व वाचा दिली आहे अशा ह्यांच्या नाम सोडून आम्ही मूर्खपणाने त्याचें नांव नाठवता आपल्या मुलाबाळांत, नातेवाईकांत, आप्तांत व संसारांत गुंग होतो ही किती दुःखाची गोष्ट आहे बरें!!!

श्री. ढाले ह्यांचे मराठी अक्षर

अनुक्रमणिका



श्री. ढाले ह्यांचे मराठी अक्षर

अनुक्रमणिका



श्री. कल्लपा यशवंत ढाले उर्फ दोडामणी

जन्म : १५-७-१८९८

निधन : २६-८-१९३१

अनुक्रमणिका



कल्लाप्पांची आई कृष्णाताई



श्री. कल्लाप्पांची पत्नी पितांबरा उर्फ ताराबाई



श्री. कल्लापांचे चिरंजीव श्री. दयानंद दोडामणी आणि कल्लापांची सून नंदादेवी

## अनुक्रमणिका

बसून चैनी केली व जेव्हा ते रुपये संपले त्यावेळी पळून जाण्याचा बेत केला (शिवबाई सह) त्या प्रमाणे एका रात्री सर्व तयारी करून माणसे जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर रात्री एक दोन वाजण्याच्या सुमारास सर्व मंडळी निघाली व त्यांच्या बरोबर माझ्या आई-बापानाही पळून जावे लागले, त्याचे कारण सर्वाना समजेलच. पुढे गाव सोडून एक दोन मैल आल्यावर जेव्हा आगगाडीने सिटी दिली त्यावेळी गाडी अंगावर येईल म्हणून सर्व घाबरले व शिऊचा नवरा येऊन धरेल म्हणून भान नाही ते पळू लागले. सर्व सडे-साटे-सुखरुप होते. पण माझे आई बाप लेकरुवाळे व बहीण शिऊबाई ही लहान असल्यामुळे त्याच्या इतके पळता येईना तरीपण जीवाचा धडा करून व आम्हास धरतील असे समजून त्यांचे मागोमाग धाऊ लागले. धावता धावता माझ्या मातोश्रीच्या (कृष्णाबाईच्या) पायात झाडाची मुळी अडकली व त्या सरसी मी खाली पडलो व 'ह्या ऽ ह्या ऽऽ म्हणून ओरडू लागलो नंतर १५—१६ मिनिटे स्तब्ध पडलो असे पाहून मुल मेले म्हणून रडू लागले. तेव्हा पुन्हा जेव्हा जीव आला असे दिसून आले. त्यावेळी जरा जीवात जीव येऊन धैर्य धरून वाट चालू लागले. व पुढे त्याची एका गावी गाठ पडली तेव्हा ही सर्व हकिगत सांगता फक्त थोरल्या चुलत्यास वाईट वाटले व रडू लागला व घरी पुन्हा पहिल्या प्रमाणे भिक्षा मागीत जत गाव गाठले व मोल मजुरी करून जोंधळ्यांची सुगी येऊ पर्यंत पोट भरले. सुगी आटोपल्या नंतर माझे नाव ठेवण्याचं ठरले. तेव्हा थोरल्या चुलत्याने दगडा धोंड्या प्रमाणे जगू दे! म्हणून कल्लप्पा हे नाव ठेवले. जन्म नाव 'यल्लप्पा' निघाले पुढे मी जस जसा थोर होत चाललो तसतसे थोडे थोडे सुख लागत चालले. पुढे तीन चार वर्षांनी आणखी (एकदा माझा पंधरा वीस मिनिटे जीव गेला होता. असे सांगतात) एक मुलगा झाला त्याचे नाव 'सीताराम' ठेवले व जन्म नाव लिंगप्पा ठेवले. पण निंगप्पा या नावानेच लोक बोलू लागले. त्याचे माझे इतके वनवास झाले नाही हे सर्व माझ्या आई बाप्पांच्या सांगण्यावरून लिहीले आहे.

(ता. ६ माहे एप्रिल सन १९११ इ.मु. जत)

**भाग २ रा**

पुढे जेव्हा ५-६ वर्षाचा झालो. त्यावेळीही दुष्काळाचे दिवस आल्यामुळे माझ्या बापाने घरातील सर्व थाळा, तांबे देव वगैरे सामान विकले व जीव जपण्याचा प्रयत्न चालविला. शेवटी माझ्या गळ्यात एक रुप्याची सरी व कानात दिड रुप्याच्या मुधा होत्या. त्यावर डोळा घालुन ते काढून घेण्याचीही खटपट चालविली हे मला समजताच मी पळू लागलो व पेठेची वाट धरली. शेवटी मला धरले व तसेच माझी समजूत घालून तुला खायाला पैसे देतो म्हणून माझ्या अंगावरून काढून घेतले व एकादी आठवड्याची गंजी करून घेतली. पुढे पुढे फारच पोटाची फजिती होऊ लागली. कारण 'माझा बाप हाताने खुळा असल्याने' व्हावे तितके काम करून मजुरी मिळवू शकत नाही. म्हणूनच पोटाची फजिती होत असे. उगेच आपले कुटू कुटू पोट चालत असे. पुढे सरकारने 'धर्म खाता' म्हणजे गरीब लोकाना भाकरी व आमटी घालण्याची व्यवस्था केली. त्यावेळी मला १ भाकरी व थोडे सांबार व तसेच निंगप्पासही मिळत असे. त्यापैकी मी व निंगप्पा वरती कोरभर भाकरी वाटतच घ्यावे व खावे. माझी मातोश्री आपल्या दोन भाकरीतूनही आम्हा दोघाना अर्धी अर्धी भाकरी द्यावी व आपण एकच खाऊन बसावे. पुढे एवढ्यात भागत नाही असे समजून माझी बहीण शाऊबाईने असा विचार केला की, कल्लप्पा व मी रोज गावात भिक्षा मागितल्यास पोटापुरते दाणे दुणे आणून असा शहाण्या व चतुर बहीणीने ठरविले व आपल्या बरोबर मला दररोज गावात घेऊन जात असे व तीन चिपटी किंवा शेर दाणे व थोडी भाकरी आणीत असे. या मुळे आम्हा सर्वांस पोटभर अन्न मिळत असे ह्या प्रमाणे अंकलगी येथेही माझे पुष्कळ वनवास झाले आहे —

अनुक्रमणिका

पुढे असेच आम्ही रोज जात असताना एके दिवशी एका वाईट ब्राह्मणाच्या मुलीने आपल्या कुत्र्यास बोलाविले. व आमच्याकडे पाठविले ते एकदम आरडा ओरडा करून आले. त्यामुळे मी फार भ्यालो व घरीच लागलेच आलो व त्या दिवसापासून मी माझ्या बहीणीबरोबर जाण्याचे सोडले व ती एकटीच काही दिवस गेली. व लवकरच तिचेही जाणे बंद पडले कारण सोबत असली म्हणजे फारशी भिती कोणासही वाटत नाही. व पुढे पाऊस पाणी पडून सुकाळ आला. अशा रितीने तो दुष्काळ पार पडला.

(ता. ६-४-१९११ इ.मु. कोल्हापूर) जत

**भाग ३ रा**

पुढे जेव्हा मी सात आठ वर्षाचा झालो. तेव्हा माझे चुलते व बाप हे मला शाळेत घालण्याचा बेत ठरविला. परंतु मी मास्तरास फार भित असे. या मुळे त्याना माझ्या वरती सक्ती करता येईना. मी असे म्हणत असे की, जर मला तुम्ही जबरीने शाळेत घालाल तर मी कोणीकडे तरी निघून जाईन एके दिवशी चुलते, बाप व बरीच बाहेरची मंडळी आमच्या घरापुढील अंगणात बसले असताना त्यानी आम्हा उभयता भावास (म्हणजे निंगप्पा व मी) पाहाताच शाळेची गोष्ट काढली तेव्हा माझ्या अंगावर काटा आला. व मी माझ्या आईकडे घरात जाऊ लागलो तरी पण त्यानी मला धरले. पंचापुढे आणले. व विचारले की, ‘तू गुरे राखण्यास चाकरी रहा, अथवा शाळेत जा’ मग मी उत्तर दिले की, ‘गुरे राखण्यास जातो’ नंतर तसेच निंगप्पास विचारले तो म्हणाला, ‘मी शाळेस जातो’ असे उत्तर मिळताच मला चाकरी ठेवण्याचे ठरले व निंगप्पास शाळेत घालण्याचे ठरले. पुढे काही दिवसानी माझा चुलत भाऊ (कझन) ति. रा. गंगाराम हा आपल्या घरी वाचीत असताना मी उगीच त्यांच्याकडे जाई व त्याच्या जवळ बसे. पुढे एके दिवशी त्याने मला एक लहानसा हिशोब (पैशाला चार केळी तर आण्याची किती) सांगितला मी लागलेच त्याचे उत्तर बरोबर दिले. व त्याला मोठा आनंद झाला. असेच पुढे काही तरी हिशोब सांगे व तो मी करी. असे वाटता वाटता एके दिवशी शिकलेली मंडळी म्हणजे यल्लपा काका (ति. मयत) लक्ष्मण, रामचंद्र, तात्याबा व तुकाराम वगैरे मंडळी तक्याच्या (महारचावडीच्या) पारावर बसले असताना तेथे मला माझ्या चुलत भावाने नेले. व त्यांच्या कडून एक हिशेब (बराच कठीण) सांगितला तेव्हा मी भित भित त्याच्या जवळ गेलो. (कारण मी प्रत्येक मोठ्या माणसाना भित असे व ति. रा. कृष्णाजी मास्तर मयत याना तर इतके भित होतो की, त्यांच्या समोर मी कधीच जात नसे) आणि त्यानी सांगितलेले तोंडचे हिशेब (चौथी इयत्तेचा) चे उत्तर बरोबर दिले. हे पाहून त्यांना इतका आनंद झाला की, ते इथे लिहिताच येत नाही. असेच दररोज संध्याकाळी एकत्र मिळून बसत असे. तेनेकरून माझी भिती मोडत जाऊन थोर मनुष्यात बसण्याची संवयी झाली व त्याच्याच समागमनाने (संगतीने) ति. रा. कृष्णाजी मास्तर यांची भिती मोडून बेलाशक त्याच्या समोर फिरे व त्यांच्याशी थोडे भित भित बोले. पुढे ति. रा. गंगाराम यांचे बरोबर मी शाळेत जाई. त्याचे स्लेट घेऊन काहीतरी शिके. असे करून एकदंर पहिल्यांदा मूळाक्षरे संपविली. नंतर ति. रा. कृष्णाजी मास्तर यानी माझी समजूत घालून काही उपदेश केला. त्यावरुन माझ्या डोक्यात शाळेत जाण्याचे घेतले व माझ्या बापासही मास्तर यानी सांगितले. तेव्हा माझा बापही आनंदी होऊन शाळेत घालण्याची इच्छा होऊन पाटी घेण्याचे ठरले. ते दिवसही दुष्काळचे असल्यामुळे स्लेट घेण्याला पैसे लवकर मिळाले नाहीत. नंतर थोड्या दिवसानी माझ्या बापाने माझ्या बहीणीजवळ (शाऊबाई जवळ) तीन आणे पैसे स्लेट करीता व १ पैसा पेन्सिली करीता दिले. नंतर मी, साऊबाई व रेवण असे तिघेजण स्लेट घेण्यास गेलो. स्लेट आणली. मुलाना शाळेत घालताना नारळ वगैरे घेऊन पूजा करतात. पण तसे मला शाळेत घालताना पूजा वगैरे न करता एकदम शाळेत नाव दाखल केले. प्रथम मला ति. रा. मास्तर यानी ‘क का’ ची बाराखडी दिली.

अनुक्रमणिका

तेव्हढी पाठ करून लागलेच दाखविली. नंतर ‘ग गा जेव्हा घातली तेव्हा असेच सगळी बाराखडी ज्ञ ज्ञा पर्यंत असेल असे गंगाराम यास विचारले. त्यानी होय म्हणताच ती सगळी बाराखडी काढून दाखविली.

ती पाहून मास्तरसाहेब हे फारच आनंदी झाले. पुढे एके दिवशी शाळेत गावातली कमिटी नाल साहेब हे आले होते. तेव्हा त्यांनी मास्तराच्या सागण्यावरून मला एक हिशोब सांगितला तो हा की, ‘तोळ्याला ९६ रु. तर एका गुंज्याला किती?’ एक दोन मिनिटानी एक रुपये म्हणून लागलेच उत्तर दिले. ते पाहून नालसाहेब हे फारच शाबसकी देऊन गेले. नंतर थोड्या दिवसानीच कृष्णाजी मास्तर काही दिवस आजारी पडून मयत झाले व त्याच्याबद्दल मला दुःख झाले पण ईश्वर मर्जी. त्यापुढे नाईलाज आहे.

**भाग ४ था**

पुढे काही दिवस शाळा बंद पडून पुन्हा सुरू झाली. त्यावेळी मि. लक्ष्मण ह्याना मास्तर नेमण्यात आले. त्यावेळी माझे पाढे संपवून पावकी निमकी चालली होती. नंतर ति. रा. कृष्णाजी मास्तर यांचा मुलगा सुजाव याचा जवळ मराठी १ ले बूक होते. ते मी सहा पैशास घेतले आणि लागलेच त्यातील १ ला धडा वाचण्यास प्रारंभ केला. मी एकदम वाचलेले पाहून, मि. लक्ष्मण याना आनंद झाला आणि ते मला विद्यामृत पाजण्याच्या कामी पुष्कळ लक्ष देत असत. त्याबद्दल त्याचा मी फार आभारी आहे. पुढे १ ली इयत्तेची परीक्षा आली. परीक्षेच्या दिवशी मास्तरानी सर्व मुलास आठ वाजता स्वच्छ कपडे व आंघोळ करून येण्यास सोडले. तेव्हा मी माझे वडील हे उभयता श्री यल्लमा देवीकडे स्नान करण्यास गेलो होतो. तिकडून येण्यास अदमासे ११–०० वाजले होते. तोच रावसाहेब खरे, डे. ए इ हे येऊन परीक्षा घेत होते व पहिली इयत्तेची परीक्षा आटपत आली होती. त्यामुळे लक्ष्मण मास्तर हे माझ्यावर रागावून दातओठ खाऊ लागले व तुला मारतो व पुन्हा १ लीतच ठेवतो. असे म्हणू लागले. तेने करून माझ्या जीवात जीव राहिला नाही. मी फार भ्यालो व शाळेस एक आठ दिवस येण्याचे सोडले.

नंतर लक्ष्मण मास्तर कृपाळू होऊन मारलेही नाहीत. दुसऱ्या इयत्तेत माझ्या हुशारीमुळे घातले. पुढे दुसऱ्या इयत्तेत असताना मास्तर फारच कडक रितीने (Strickly) पाढे करून घेत असत. एके दिवशी माझ्या वर्गातील रा. तसण्णा, रानप्पा व यशवंता यांना पाढे येत नाहीत म्हणून फार फार मारले व त्यांचे हात लाल भडक करून सोडले. मलाही थोडे बहूत मारले. असेच एके दिवशी माझे डोळे दुखत (आले) होते त्यामुळे मला शाळेस जावविले नाही तरी पण लक्ष्मण मास्तरांनी दोन मुलास माझ्या घरी पाठविले व मला ओढून नेण्यास त्या दांडकेश्वर मुलांनी आरंभ केला. त्यावेळी आमचे घरी कोणीस नसून आई-बाप रानात गेले होते. (फक्त आमचा चुलता लायप्प काकाच व चि. रा. लिंगप्पा बंधू हे होते) मला ओढू लागले तेव्हा निंगप्पाही मजबरोबर रडू लागला. मी काका काका म्हणून ओरडू लागलो. पण त्यानाही माझी दया न येता त्या मुलांना ओढून न्या म्हणून सांगितले. तेव्हा माझी पाचावर धारण बसली. मी सोडण्याबद्दल त्या मुलांना पुष्कळ विनवणी केली पण सर्वही फुकट गेली. त्यांनी वाटेने ओढून नेताना माझे पुष्कळ हाल केले. ते सर्व मला सोसून घ्यावे लागले शेवटी शाळेत दाखल झालो. मग लक्ष्मण मास्तर हे इतके काय रागावले होते ते येथे लिहिताच येत नाही. खरोखर, तो राग मजवरचा नसून दुसऱ्या कोणावरचा असावा असे मला वाटत होते. नंतर पेटीतील सामान काढून तोत मला कोंडून ठेवण्याचे ठरले. या बद्दल मी लक्ष्मण मास्तरांच्या पायावर लोटांगणे घेतले व फार फार विनवणी केली. त्यामुळे त्यानाही दया येऊन फारसे मारले नाही. या दोन कारणामुळे आम्ही तिघेजण एके दिवशी शाळेस गेलो नाही. फक्त यशवंता हा गेला होता.

अनुक्रमणिका

आमच्या तिघात चैनीच्या गोष्टी चालल्या व रा. तमण्णा हा म्हणू लागला की, तो मास्तर नव्हे, वादी आहे. कारण भावबंद असल्यामुळे आम्हास अशा रितीने वागवितो. ह्या त्याच्या म्हणण्यास आम्हीही माना डोलविल्या. खरोखर हे आमचे बोलणे किती चुकीचे व आपराधाचे आहे. हे आपणास समजेलच. मग त्याच दिवशी संध्याकाळी प्लेगोबाची स्वारी जतेत आल्यामुळे शाळा बंद ठेवण्याबद्दल नोटीस आली. ती हकिगत लागलीच यशवंतानी येऊन सांगितलं त्यावेळी आम्हास इतका काय आनंद झाला तो येथे लिहीण्यास येतच नाही.

(ता. ७-४-११ इ. जत)

**भाग ५ वा**

पुढे तीन चार महिन्यानी पुन्हा शाळा सुरु झाली. त्यावेळी लक्ष्मण मास्तर जाऊन त्याबद्दल (टिवन्स) रामचंद्र भाऊ हे आले व अभ्यास बरा चालला. इतक्यात आणखी पुन्हा पाऊस पडेना व दाणे महाग होऊन दुष्काळास आरंभ झाला. तेव्हा पुनः शाळा बंद ठेवण्यात आली. त्यावेळी मला फारच वाईट वाटले. पण नाईलाज. नंतर सरकारानी तळेवर सडकावरती माणसास जगविण्याचे सुरु केले. त्यावेळीही आमचे फारच पोटाचे हाल होऊ लागले. आमची मातोश्री हे एकटेच काम करणारी होती व बापास काम होत नसल्यामुळे पोटाने मरावे लागले माझी आई दाण्यात कोणीतरी दिलेला कशाचा तरी कोंडा घालून भाकरी करून वेळ मारीत असे व भाजी अतिशय कनिष्ट आणून घालीत त्या भाजीची नावे मला माहीत नाहीत. माझी आई सडकेचे काम करूनही आमचे कोणाचे तरी दळण कांडण करीत असे व गावात शेण घालून पोटापुरते तुकडे आणीत असे. तिच्या प्रमाणे माझी शहाणी बहीण साऊबाई ही काही तरी खटपट करीत असे. व मी व माझा निंगप्पा हे आम्ही उभयता— त्याच्या सांगण्यावरून व ओळखिवरून मन नाईकिनीच्या (फळवातीनीच्या) घरी रोज शेण घालून थोडीशी भाकर आणीत असे तसेच गुरवांच्या घरी पत्रावळ्या करण्यास लिंबाच्या काड्या गोळा करून देऊन त्याच्याकडूनही भाकरी आणीत असे. यामुळे त्या दुष्काळातून फक्त हाडाने जगलो. त्यावेळी मी माझ्या मनात म्हणत असे की, प्राण गेलेला बरा, हा त्रास नको. परंतु प्राण जाणार कुठला. या दिवसातच दयाळू शिवकरण यास मारवाडी गरीब मुलांची दया येऊन दररोज चुरमुरे—फुटाणे वाटीत असे. त्यामुळे मुलांना सकाळी न्याहारीस फुटानी मिळत असत. एकेदिवशी चेंकट नारुच्या दुकानापुढे मी व निंगप्पा गेलो व तेथे फुटाण्याची वगैरे टोपली भरून ठेवली होती. त्यात मी हात घालून थोडेसे फुटाणे घेतले. ते या चेंकट नारूने पाहिले. लागलेच त्याने मला जवळच्या ग्याटीवर नायकाच्या स्वाधीन केले; तेव्हा त्या नायकाने कोंबडीच्या खुराड्यामध्ये कोंडून घालण्यास एका महाराच्या दांडग्या मुलास बोलाविले त्या दांडग्याने मला आत ढकलले, त्यामुळे माझ्या डोक्यास दगड लागून रक्त निघाले. तो मुलगा माझ्या ओळखीचा होता. त्याचे नाव चंदू. त्याला पुष्कळ विनंती केली परंतु त्याने आंत ढकलण्याचे सोडले नाही. मग त्या नायकासच माझी किव येऊन सोडण्यास सांगितले. तेथून मी घरी आलो व त्या दिवसापासून पेठेत काही दिवस जाण्याचे सोडले. मी मुलाबरोबर गावात गूळ खाण्यास जात असे. मुले गाडीतील ढेपा फोडून गूळ घेत असत व निंगप्पाही घेत असे. पण मला त्या मूळच्या गोष्टीची आठवण होऊन मी शिवत नसे, मात्र वाणी लोकास विनवणी करून गुळाचे बोरे धुण्यास मागत असे, त्यालाही माझी दया येऊन, बोरे देत असत. त्यातील गूळ काढून मी ते स्वच्छ धुऊन देत असत. इतके असूनही एके दिवशी एका वाण्याने माझे डोक्यावरील पागोटे उगीच्या उगीच काढून घेतले. मग मी रडू लागलो तेव्हा त्याने मला परत दिले. पुढे पाऊस पडून पिकेबिके बरी आली. जीवास थोडेसे सुख लाभू लागले.

अनुक्रमणिका

(ता. ७-४-१९११ जत)

**भाग ६ वा**

पुन्हा शाळा सुरू झाली त्यावेळीही रामचंद्र मास्तरच होते. प्लेगामुळे व दुष्काळामुळे माझी मराठी दुसरी इयत्ता दोन वर्षे चालली होती. माझ्या वर्गातील सर्व मुले शाळा सोडली त्यामुळे माझ्याही मनाने त्याप्रमाणे करण्याचे घेतले. पण बापाच्या धास्तीने व रामचंद्र मास्तराच्या कृपाळूपणाणे मी कसा तरी दुसरीचा अभ्यास केला. माझी आई कृष्णाबाई हीने मला शाळेतून काढण्याची फार खटपट केली पण माझ्या बापाने तिचे चालू दिले नाही. माझा बाप म्हणत असे की, कलाप्पाला पुढे काम होणार नाही. याकरीता त्याला शाळेतच ठेवले पाहिजे. त्याच्या नशिबाने तो काहीतरी शिकला तर त्याचा बचाव लागेल नाहीतर व्यर्थ मरुन जाईल. खरोखर मी आता सुद्धा फारच अशक्त व नाजूक आहे. लहानपणी तर मी फारच नाजूक होतो त्यात संशय नाही. व खरोखर मला काम होणार नाही हे म्हणणे बरोबर होते. त्यामुळे माझ्या आईनेही आपली खटपट सोडून दिली. नंतर माझी २ री परीक्षा पास होऊन ३ री इयत्तेत मास्तरानं ठेवले. मी ३ रीत असताना काही कारणामुळे मे. करंदीकर कारभारी यांनी आमची शाळा गांवातील मुसलमान शाळेत भरविली. ती शाळा आमच्या घरापासून जरा दूर असल्यामुळे लवकर जाववत नव्हते व माझ्या क्लासात एकटाच असल्यामुळे व्हावा तसा अभ्यासही होऊ शकत नसे. त्यामुळे रामचंद्र मास्तर माझ्यावर फारच रागावित असे. पुन्हा जेव्हा आमची शाळा पहिल्या शाळेत भरू लागली तेव्हा मी अभ्यासासही सुरुवात केली. मला माझे मास्तर बुकांची वगैरे गोष्टीने फार मदत करीत असत व म्हणत असत की, तू फार गरीब आहेस. तुझे कल्याण माझ्याने होईल तितके खटपट करून करतो. असे म्हणताच मलाही मोठा आनंद वाटत असे. व त्यानी मला तिसरी व चौथी इयत्तेची काही जुनी व काही नवी पुस्तके देऊन मदत केली. त्याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहे. व त्यांचे उपकार जन्मभर विसरणार नाही असा मी मनाचा ठरावच केला आहे. मी २ रीत, ३ रीत होतो. त्या वेळेपासून माझ्या बापाबरोबर रानात भिक्षा मागण्यास जात असे व रानात गेलो म्हणजे कणसे मोडून बापाजवळ देत असे. असे करून दररोज पायली अड सरीची बेजमी आम्ही आणीत असे. मी, माझी आई व बाप हे तिघेजण दररोज आसपासच्या खेड्याच्या रानास (कंठी पाषाण वगैरे) बाजरीच्या पेंढ्या मागण्यास जात असे. माझ्यावाचून माझा बाप रानात जात नसे. कारण मी गेलो म्हणजे रयत लोकांच्या मळ्यात माती घालून पोट भरीत असे. त्यावेळी मी शाळेतही जात असे. सकाळी शाळा संध्याकाळी रान असे नेहमी चाललेले असे. एके दिवशी संभू मळ्यात व्हंडी मोडतात असे समजताच मी, निंगप्पा व बाप असे तिघेजण गेलो. तेथे जाताच निंगाप्पाने एक कणीस मोडून आणले. तितक्यात माळ्याने पाहिले व गोफण घेऊन आला व आम्हा तिघासही त्या गोफणीने झोडपू लागला. मी, व निंगप्पा माझ्या बापाच्या मागे भिवून आड होताना त्याने दांडगेश्वराने माझ्या बापास इतके मारले की, त्यांच्या अंगावर मोठ मोठे वळ उठले. आमच्याही थोडेसे उठले होते पण बापाचे ते वळ बघून आम्ही दोघे भाऊ भाऊ रडू लागलो. पण काय करावे इलाज नाही. त्यावेळी आम्हास इतके काय दुःख व संकट प्राप्त झाले होते. ते येथे लिहिण्यास माझी लेखनीच चालत नाही. नंतर तेथून आम्ही घरी आलो. माझ्या आईने हे आमचे वळ वगैरे बघून रडण्याचा गोंधळ मांडीला व तिच्या बरोबर रडू लागलो. मग आम्ही रानात जाऊन फक्त भिक्षेच्या पेंढ्या आणून पोट चालविले. इतके दुःख सोसूनही मी माझा अभ्यास करीत असे. नंतर माझी तिसरीची परीक्षा पास झाली. मला कागद वगैरे खर्चास पैंशाची फारच अडचण येईल तेव्हा पोटातलेच कमी करून माझा बाप मला पैसे देत असे. आईचे मन आमच्या विरुद्ध होते. ती म्हणे की, आम्हा महार लोकास शिकून काय करावयाचे तरी पण मी शाळा सोडली नाही. अशा रीतीने माझी ३ री इयत्ता सन १९०६ मध्ये पुरी केली.

अनुक्रमणिका

(ता. ७।५।१९११ जत)

**भाग ७ वा**

माझे ३ री इयत्ता पास झाल्यावर सन १९०६ मध्ये ४ थी इयत्तेमध्ये आलो. या वेळी रामचंद्र मास्तर यानी मला पुस्तकांची फारच मदत केली व अभ्यासास सुरवात करवीत त्याबद्दल मी फार त्यांचा आभारी आहे. असे तीन चार महिने जातात, तोंच १९०७ साली पुन्हा पाऊस पडेनासा होऊन दुष्काळास आरंभ झाला. शेवटी आमची महार शाळा बंद ठेवण्यात आली.

शाळा बंद होताच. बापाखेरीज करून आम्ही सर्व पिंपरी मळ्याकडे सडकेस लागलो. या पूर्वी मी माझ्या आई बरोबर लाकडे आणून विकत असे व पोट भरत असे. त्यावेळी माझे वय अदमासे १० वर्षांचे होते. आईस ६ पैसे, मला ४ पैसे, व निंगापास ४ असे रोज ३॥ आणे यायाचे. एवढ्यामध्ये आमच्या सर्व कुटुंबाचा खर्च भागणे शक्य नव्हते. आमचा बापही काही तरी पोटापुरते रोज आणीत असे पण मला मुळीच काम करण्याची संवय नसल्याने भरण्याचेही व पाटी घेण्याचे होत नसे. डोकीवर पाटी घेतली म्हणजे डोके भग भग होई. व पाटी वाटेतच खाली टाकी. यामुळे एकदम रागाने जाऊन कारकुनास माझी गैरहजेरी मांडण्यास सांग. यामुळे मी कसे तरी करुन पाटी घ्यावी. आणि रडावे आणि दिवस काढावा. असे करून, करून मी फारच कावलो. दररोज पहाटेस माझी आई कामास उठविताना तिच्यावरच राग आणून काहीतरी म्हणे. पण ती बिचारी काही एक मला न म्हणता उगीच माया लावून उठवावे व कामास निघावे. एके दिवशी मी फारच रागावलो आणि माझ्या लहान बहिणीस व बापास म्हटले ‘तुम्हास काय झाले काम करायला. तुम्ही का कामास लागत नाही, आम्हीच तुम्हास राबून घालावे असा मक्ता घेतला आहे काय. मी आज कामास जात नाही.’ असे म्हणताच बाप गप्प बसला. बिचारा काही एक बोलला नाहीं. व तसाच मी रागात कामावर गेलो. असे दररोज हे भांडण होत असे. एके दिवशी घरी येण्यास रात्र होईल म्हणून आम्ही त्या दिवशी रात्री ऐथेच झोपडीमध्ये राहिलो. कारण घरापासून तीन चार मैल अंतर होते.

त्या दिवशी पावसाची झडही लागली होती. आमची आई दुसऱ्याजवळ दाणे उसने घेऊन आली. डबऱ्यात कण्या शिजवीत होती. तेव्हा माझी लहान बहीण साऊबाई ही रडत रडत आईकडे चालली व डबऱ्यात इतक्यात पडणार तोच मी जाऊन धरले त्या दिवशी झड लागलेली होती व काळोखही पडलेला होता. जर आम्ही मुलाला धरले नसते तर खचीत मेले असते. त्या दिवसामध्ये बापाने करडे घालण्याचे कबूल करून पेवातील काळे दाणे एक मणभर आणले होते. ते मला खेरीज करून सर्वजण खात असत. असे ४।५ महिने रडत ओरडत काम केले व पुढे पाऊस पडू लागला. रानात भाजीपाला येऊ लागला. तेव्हा मी काम सोडून दिले व बाबाबरोबर कोठे तरी मळ्यानी जाऊ लागलो. मी बापास व बहीण सीऱ्याव्वाबाईस जे मागे बोललो होतो त्याचा मला पश्चात्ताप वाटला व मी मूर्ख, गाढव त्यावेळी होतो असे म्हणटले. अजूनसुद्धा त्या गोष्टीची आठवण होताच फार वाईट वाटते. पुढे पाऊस पाणी होऊन पिके आली. तेव्हा सर्वजणच काम सोडले व पहिल्याप्रमाणे पुन्हा रानात जाऊ लागलो व पोट भरू लागलो.

(ता. ७।४।१९११ इ. जत)

अनुक्रमणिका

**भाग ८ वा**

पुन्हा शाळा सुरू झाली व अभ्यासास सुरवात झाली. त्या दुष्काळामुळे माझे एक वर्ष फुकट गेले. मग एक वर्ष ४ थीचा अभ्यास करून सन १९०७ इसवी महिन्याच्या आक्टोबरच्या ३१ व्या तारखेस ४ थीची परीक्षा दिली. परीक्षा घेण्यास कृष्णराव केशवराव गोखले (रा. पुणे) हे आले होते. मी गुळाच्या पाण्याने बालबोध अक्षर (छापीला सारखी) लिहून पांढरे करून शाळेत भिंतीस डकविले होते. ते पाहून ते फार आनंदी झाले. पहिल्यादा मला त्याने दोन उदाहरणे घातली. ती मी करून दाखविली. पुन्हा गावातील मराठी १ च्या शाळेत ५ वी इयत्तेत घातलेले उदाहरण मला तोंडी करण्यास सांगितले. ते मी तोंडीच करून दाखविले. (एक काम १७ मनुष्ये १५ दिवसात करतात तर ३४ मनुष्ये दोन काम करण्यास किती दिवस लागतील?) तसेच दुसऱ्या प्रश्नांची उत्तरे दिली. ती पाहून त्याना फार नवल वाटले. व त्यांनी शेरा खाली लिहील्याप्रमाणे दिला.

शाळा जत नं. ३ (महार शाळा)

शिक्षक मेहनती व योग्य आहेत. पहिल्या नंबरच्या मुलाने (कल्लप्पा यशवंत महार (ढाले) याने) विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिले. ते पाहून आम्हास फारच आश्चर्य वाटले. सदरहू मुलगा फार हुशार आहे. जत शहरात हाच काय तो हुशार मुलगा आहे असे आम्हास दिसते. आम्ही त्यास स्पेशल स्कॉलसशिप देण्याबद्दल शिफारस करणार आहोत. बाकीच्या मुलांनीही समाधानकारक उत्तरे दिली. ता. ३१-१०-१९०७ इ.

सही

**के.के. गोखले**

डे. ए. इ. संस्थान जत

असा शेरा मिळताच मी मोठा आनंदी झालो व रावसाहेब गोखले यानी मला तोंडीही सांगितले होते की, तुला मी काही तरी सरकाराकडून मदत करवीन व दिवाळी दिवशी एक पावली दिली. त्यानी विचारल्यावरून मी सर्व माझ्या घरची हकिगत कळविली होती. माझा बाप काम करू शकत नाही. सध्या रानात बाजरीच्या पेंढ्या मागण्यास जात असतो असे सांगितले होते. ते उद्याला आपल्या बंगल्याकडे ये असे सांगितले. तेव्हा मी गेलो. ते मे. कारभारीसाहेब त्याना विचारले नाही असे म्हणाले तेव्हा याकरिता मी रोज जात असे. शेवटी श्रीमंत रामराव डफळे त्यानी सक्तीची शाळा काढण्याचे ठरविले तेव्हा त्यात मास्तरास दोन रुपये घेऊन मदत करावी असे ठरले. पुढे थोड्या दिवसांनीच जतेला प्लेग महाराजांची स्वारी आल्यामुळे गांव फुटले. झोपडी बांधून लोक रानात गेले. प्लेगोबाने माणसे मारण्याचा सपाटा चालविला. एके दिवशी निलप्पा याची आई व बहीण ह्या एकदाच मयत झाल्या. त्यावेळी माझ्याजवळ २ आण्याचे पैसे होते मला असे वाटले, मनुष्य भरारा मरत आहेत तर आपली धडगत उरावयाची नाही. आता जर मरण आले तर हे दोन आण्याचे पैसे माझ्या मागे येणार नाही. असे समजून त्या दोन आण्याचे गुळ-खोबरे आणले व शाळेत बसून खाल्ले. नंतर मी. निलप्पा सकाळी मला भेटले. त्याच्या दुःखाबद्दल मलाही फार वाईट वाटले. पुढे प्लेग फारच वाढला व तेही दिवस चांगले नसल्यामुळे आमच्या कुटुंबाच्या पोटाची फजितीच चालली होती. तशात माझ्या मनाने त्या दोन कारणामुळे हिंगणगावास जाण्याचे घेतले. इतक्यात माझा

मावस भाऊ परशू हा सोरडीस माझी मावस बहीण आऊबाई हिला आणावयास चालला होता. तेव्हा त्यास माझ्या आईबापाने मला घेऊन जाणेस सांगितले. त्याप्रमाणे तो लवकर आला नाही म्हणून माझ्या बापाने खलाटीपर्यंत घालवित आला व तेथून एक्टा जा असे म्हणाला. इतक्यात मावस भाऊ परशू हा त्या गावास आला. आम्ही मग उभयता हिंगणगांवची वाट धरली. त्या वेळी मी माझ्या बापाच्या पाया पडताना त्याला ह्या प्लेगाचे दुःख वाटून रडला. तेव्हा मलाही थांबविले नाही. नंतर बापाने जतेची वाट धरली व आम्ही हिंगण गावास निघालो. तेथे गेल्यावर माझ्या मावशी (कोयनाबाई जोगती) 'म्हणाले बरे आलास बाबा तेथला प्लेग जाऊपर्यंत येथेच रहा.' कधी कधी आमच्या आईच्या मावशीकडे जाऊन जेवत असे. हिरा मानीगांवकर व परशू दररोज करंजा आणून त्यातील बिया विकून पोट निर्वाह करीत असे. त्याच्या बरोबर मी करंजा घरी फोडून बिया काढीत असे. १५।१६ दि. राहिल्यावर थोडेसे वाईट वाटून सेरेनासे झाली व एके दिवशी माझ्या मावस बहीणीने (शिऊबाईने) काही कारणाने मला एक शिवी दिली. त्यामुळे मला फार वाईट वाटले. तेथून निघून जाण्याचे ठरविले. मी तेथून कवठ्यास जाऊन घराकडे पत्र पाठवित असे. इतक्यात माझा मावस भाऊ लहू (वडील) हा आपल्या बस्तवड्याहून काही कामाकरिता आला होता. तेही त्यावेळी पोटाने उपाशी मरत होते पण त्यानी मला फार खुषीने नेले. ते दिवस भूईमुगाच्या शेंगा काढण्याचे होते. तेव्हा रोज सेंगा खाण्यास मिळत होत्या. माझी थोरली मावशी आकूबाई ही फारच मायाळू असल्यामुळे तिने माझे पोटाला फार पाहिले. दररोज रात्री आपल्यातील भाकरी कमी करून मला न्याहारीस थोडीशी भाकरी ठेवीत असे. माझा लहान मावसभाऊ हरी हा वेडगळ असल्यामुळे तो माझ्या अंगावर पडे. काहीतरी चावटपणा करी, ते मला न आवडून मी मारे व माझी मावशीही मारे व दररोज सेंगा खायला मिळाल्यामुळे (माझी गालफुगी लहानपणापासून उठत असे) माझी गालफुगी उभारली व दुखू लागली. (कारण सेंगांच्या वावड्याने ती फुगत असते) त्यावेळी तेथे किंचित प्लेग होता. 'तेव्हा प्लेगोबाने कल्लपाला गाठले असे माझ्या मावशीस वाटून ती माझ्या भोवती रडत बसू लागली' तेव्हा मी तिला सांगितले तू भिऊ नकोस, कारण मला ती गालफुगी होत असते. तरी तिला भिती वाटून तिने जो देव पीरसाहेब त्यास एक पैशाची साखर वाटतो असे नवस कर म्हणजे ठिक होईल. त्या तिच्या म्हणण्याप्रमणे मी त्या देवास नवस केले. पुढे एके दिवशी पत्र लिहून घेण्यास एक बाई आली. तिने त्या पत्राबद्दल १ पैसा दिला. तोच पैसा मी त्या देवास अर्पण केला. पुढे तिथे तीन आठवडे राहीलो असताना माझे मावस बहीण कासाबाई हिने मला फार ममतेने वागविले त्याबद्दल तिचा मी आभारी आहे. नंतर मी जतेचा प्लेग बंद झाला असे समजून पुन्हा जतेस जावे म्हणून माझ्या आकूबाई मावशीस हिंगणगावापर्यंत घेऊन आलो. इतक्यात माझा बाप (यशवंत) हिंगणगावास आला होता. तेव्हा त्याने मला सांगितले की. तुला दोन रुपये देण्याचे रावसाहेब गोखले यांनी ठरविले आहे. करितां मी घेऊन जाण्यास आलो आहे असे सांगताच मला मोठा आनंद झाला आणि एक दिवस राहून तिसऱ्या दिवशी जतेस जाण्यास निघालो. तेथे गेल्या दोन महिन्याचा पगार ४ रु. घेतला. माहे डिसेंबर सन १९०७ इ. महिन्यापासून दोन रुपये सुरू झाले. (आणखी एक गोष्ट मागाहून आठवण झाली आहे. यामुळे येथे लिहीतो माझा बाप काही सरकारी कामावर असताना, आगाऊ पगार घेतला होता तेव्हा त्याने थोडे दिवस काम केले नव्हते. असे कारकून याने गैरहजेरी मांडली होती. म्हणून १२ रु. चे आमच्या घराला निलाव लागणार होते. खरोखर आमचे बापाने काम केले होते पण नाईलाज त्या कारकुनाची ही चूक, असो! मग एके दिवशी आमचा बाप कवठ्यास गेला असताना पाटील/कुलकर्णी येऊन निलाव करू लागले. मी पाटलास सांगितले की, माझा बाप आल्यावर जे करावयाचे आहे ते करा.

तरी पण त्यांनी माझे मनावर न घेता निलाव चालविला, प्रथम ऐदाले तुकाराम यानी ३ रु. ठरविले. परंतु सिताराम काळे हा आमच्या बापाचा वादी असल्यामुळे त्याने जास्त वाढविण्याचा सपाटा चालविला. तेव्हा घर त्याने घेतले म्हणजे पुन्हा आम्हास मिळणार नाही असे समजून मी रामचंद्र मास्तर यांचेकडे

शाळेस रडत रडत गेलो व ही हकिगत सांगितली. तेव्हा मास्तरास माझी दया येऊन त्याने आपल्या मातोश्रींच्या हातातील तोळबंद घेतली व मूळचे १२ रु. भरले. पुढे त्याचे रुपये आम्ही फेडून टाकिले पण घर आमचे आम्हास मिळाले म्हणून मी आमचे माणसे त्याचे आभारी आहोत. मी चौथी इयत्तेत असताना एके दिवशी रामचंद्र मास्तर यांनी शब्दार्थाबद्दल माझ्या हातावर दोन छड्या मारल्या तेव्हा मला घेरी येऊन मी पडलो. तेव्हा मला फारच दुःख होऊन रडू लागलो. तो दोष माझ्याकडेच. विद्यामृत पाजण्याच्या कामी लक्ष्मणापेक्षा रामचंद्र यानी फार मेहनत घेतली आहे. मी याच्या मागे लंगोटी घालीत होतो. पुढे जेव्हा १३-१४ वर्षाचा झालो त्यावेळी कपडे मिळू लागून धोतरे नेसण्याचे संवयी लावू लागली. त्यावेळी मलाही पण लाज वाटू लागली व धोतराचा चाळाही मी संवयी होऊपर्यंत वरतीच खवित असे. माझ्या अंगावर जेव्हा कपडे लोकांना दिसू लागली तेव्हा ते माझी चेष्टा करू लागली व वारगीची मुलेही फार चेष्टा करू लागले. तेव्हा मलाही पुष्कळ राग येऊ येत असे पण 'सरडाची धाव कुपणापर्यंत' अशी गत झाली होती. कारण अंगी सक्ती नसल्यामुळे 'राग आहे पण बळ नाही' असे होऊन गेले होते. जिकडे तिकडे मला निंदू लागले. चेष्टा करू लागले व एखाद्या दिवशी रडवू लागले व भांडण काढू लागले. इतके सोसूनही मी गप्प बसे व कोणाबरोबर विशेष बोलत नसे. पुढे ते फार चेष्टा करू लागले तेव्हा मी त्याच्याबरोबर दोन महिने बोलण्याचेच सोडले व घराच्या बाहेर फारसे निघत नसे 'आपली शाळा भली की आगण भले' वाईट लोकांची संगत धरण्यापेक्षा सभ्य व चांगल्या मनुष्यांची संगती धरल्याने आपले बरे होईल म्हणून असल्या मनुष्यास बरेच दिवस शोधीत होतो कळावे ता. ८।४।१९११ इ. मुक्काम कोल्हापूर.

**भाग ९ वा**

नंतर मी मराठी ५ वीत पडलो व 'मदतगार' या नावाने २ रु. स्कॉलर-मिळू लागली. चांगल्या मनुष्याची संगत शोधीत असल्यामुळे मला सुदैवाने मी. निलाप्पा ऐदाळे सक्ति शिक्षण मास्तर याची संगती घडून आली. यावेळी माझे वय अजमासे १५ वर्षाचे असे व सभ्य निष्कपटी व कोणाची निंदा न करणारे असल्यामुळे त्यांच्यावाचून एक मिनिट सुद्धा रहावत नसे. मी त्यांच्या घरी (शाळेच्या वेळाशिवाय) दिवसभर बसत असे. वाईट लोकाच्या बोलण्याचा विसर पडू लागला. येणेकरून माझी निंदा व चेष्टा करण्याचे कित्येक कनिष्ट मनुष्याने सोडून दिले; पण काही लोकांनी मात्र पुढे काही दिवस सोडले नाही. जरी मला दोन रुपये मिळत होते तरी पण मी मास्तरास कोणत्याच प्रकारची मदत करीत नसे व मास्तरही काही बोलत नसे. याबद्दल त्यांचा आभारी आहे. पुढे नोकर लोकांना पेन्सली देण्याचे श्री. रामराव डफळे यांनी ठरविले तेव्हा पगारातून प्रत्येक रुपयातून एक आणा काढून घेण्याचे असल्यामुळे मला 'मदतगार' म्हणण्याचे सोडून देऊन स्कॉलरशिप विद्यार्थी म्हणू लागले. कपटपणा सोडून देऊन सत्य वागण्याबद्दल व संकट समयी न सोडल्याबद्दल माझे व निलाप्पाची हातावर हात मारून शपथ झाली. तिथून आम्ही एकमेकांत कपटपणा व निंदा होऊ न देण्याबद्दल खबरदारी घेतली. पुढे पुढे आम्हा दोघामध्ये चैनिच्या गोष्टी होऊ लागल्या व मौज करू लागलो येऊन जाऊन शाळेत, घरीदारी, रानात ह्याच प्रकारच्या गोष्टी बोलू लागलो कुकर्मे घडत. त्यावेळी माझे वय १५।१६ वर्षाचे असल्यामुळे मला वाटत असे की, मी वयाने पुष्कळ मोठा आहे व मला तरुणपणही प्राप्त झाले आहे. ह्या आमच्या कार्याबद्दल लोक आम्हा दोघासही वाईट म्हणू लागले. या चैनीच्या गोष्टीमध्ये माझा ५ वी इयत्तेचा अभ्यास बिलकूल झाला नाही. ह्यावेळीच मि. शिवराम जानबा कांबळे यांच्या 'सोमवंशीय' नावाच्या छोट्या पत्रकामध्ये आमच्या जातीची चांगली सुधारणा होत आहे व बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या देशात आमच्या जातीकरिता पुष्कळ कनवाळू लोक उत्पन्न होऊन आम्हा लोकाना सक्तिने इंग्रजी व मराठी शिकवितात व महाराजसाहेब हेही फारच काळजी वाहतात. असे वाचून मला फार आनंद झाला व तिकडे जाण्याचे माझे मनाने घेतले आणि

अनुक्रमणिका

तिकडे जाण्याबद्दल मे गोखले साहेब त्याना विचारले तेव्हा तें म्हणाले, तिकडे जाऊ नको. मी स्वतः इंग्रजी शिकवतो. असे म्हणताच त्यानी लागलेच आपल्या मुलीची इंग्रजी शब्द उतरलेली वही मला पाठ करण्यास दली व दुसऱ्या दिवशी प्रायमरही दिले. हे त्याचे कृपाळूपणाचे कृत्य पाहून मला इतका काय आनद झाला तो पोटात मावेना. लवकरच मी प्रायमर बुक संपविले व फर्स्ट बुक घेतले नंतर वार्षिक परिक्षा आल्यामुळे ५ इयत्तेची परीक्षा द्यावी लागली पण मी बरोबर अभ्यास केला नसल्यामुळे (कारण निलाप्पाच्या संगतीने) परीक्षेस उभे राहण्यास भिती वाटू लागली.

नंतर रावसाहेब गोखले यानी एकंदर ४ उदा० घातली. त्यापैकी माझे १ चुकल्यामुळे व तसाच दुसराही अभ्यास कच्चा असल्यामुळे उत्तरे बरोबर देता न आल्यामुळे गुदस्ताची उमेद तुझ्या जवळ नाही, यंदा तू अभ्यास केला नाही असे म्हणाले तेव्हा मला फार वाईट वाटले पण काय करावे. चैनीचा व मौजेचा बाजार केला होता!! मला इतिहासाची काहीच उत्तरे आली नाहीत म्हणून त्यानी थोडासा म्हणजे १५-१६ पाने आठ दिवसाच्या मुदतीने दिला व तो पाठ करून मि. लेले मास्तर याना दाखीव म्हणजे तुला पास करीन. असे म्हणताच मी फार घाबरलो आणि महारवाड्यातील लोकही नावे ठेवू लागले. तरी पण धैर्य न सोडता निलाप्पाची संगत (थोडे दिवस) सोडून देऊन मी माझ्या इतिहासाकडे वळलो व मुदतशीर पाठ करून लेले मास्तराना दाखविला तेव्हा त्यानी ५० पैकी ४० मार्क दिले व अशा रितीने पास झालो. पुनः दररोज रावसाहेब गोखले यांच्याकडे शिकण्यास जाऊ लागलो व पहिले फर्स्ट बुक २ महिन्यात संपविले व लागलेच सेंकड बूक रावसाहेबांनी दिले. मे महिन्यात रावसाहेब गोखले हे पुण्यास जाऊ लागले. रावसाहेब हे पुण्यास जातेवेळी ह्या आमच्या वियोगामुळे मला एक आठ दिवसापर्यंत बिलकूल बरे वाटले नाही. अन्न सुद्धा गोड लागत नव्हते. कारण प्रितीच फार बसली होती. तेव्हा त्यांनी माझे शिक्षण बंद पडू नये म्हणून ति. रा. वझे मास्तर यांना शिकविण्याबद्दल सूचविले. तेव्हा त्यानी माझे सेकंड बूकही संपवून सरळव्याज वगैरे उदाहरणाची माहिती दिली. याबद्दल मी ति. रा गोविंद वझे इंग्लिश मास्तर (रहाण्याचे ठिकाण कोल्हापूर) यांचा भी फार फार आभारी आहे. पुढे रा. गोखले हे जून महिन्यात येऊन त्यानी मला थर्ड बूक (तिसरे) लावले. तेव्हा मी म्हणटले नुसते प्रोज (वाचन) होऊन भागणार नाही. करिता मेहरबानगी करून भाषांतरही घेण्याचे करावे. तेव्हा ते म्हणाले, भाषांतरची आता जरुरी नाही. पण माझ्या आग्रहाने ते शिकवू लागले. लवकरच पहिले भाषांतर संपवून दुसऱ्यास आरंभ केला. इतक्यात इंग्लिश शाळेची परीक्षा चालली होती. तेव्हा रावसाहेब गोखले यानी मला ३ च्या परीक्षेस बसविले तेव्हा ८ पैकी ३ उदा. आली व इग्लिशही थोडे कच्चे असल्यामुळे द्यावी तशी उत्तरे देता आली नाहीत व इतिहास भूगोल तर काहीच आला नाही. पुढे कोल्हांपूरास अथवा मुंबईस जाण्याचे जेव्हा माझ्या मनाने घेतले तेव्हा जाण्याबद्दल रावसाहेब गोखले याना विचारले व त्यानीही परवानगी दिली, पुढे मला शिकविण्याचेही बंद पाडीले कारण मी कोणीकडे तरी जाणार होतो तर कशाला शिकवावे असे म्हणत असे. त्यावेळीच मि. जिवाप्पा व रामचंद्र मास्तर बरोबर कोल्हापूरास येण्यास निघाले. पण घरच्या आईबापांच्या म्हणण्याच्या विरुद्ध जाऊ नये म्हणून मी त्यांच्याबरोबर कोल्हापूरास गेलो नाही. पुढे आणखी रावसाहेब गोखले हे पहिल्याप्रमाणे शिकवू लामले व माहे जून सन १९०९ इ महिन्यापासून ३ रु. स्कॉलरशिप सुरू झाली.

माझे थर्ड बूक व नंतर भाषांतराचे काही धडे झाल तोच पुन्हा जिवाप्पा, निंगप्पा, ऐदाळे व म्हाळू हे कोल्हापूरास जाऊ लागले. तेव्हा मलाही जाण्याची इच्छा उत्पन्न झाली व माझ्या आईबापानी परवानगी दिली व सकाळी पहाटेस जाण्याचे ठरले.

श्रीमंत डफळे सरकार माझी स्कॉलरशिप चालविण्याबद्दल अर्ज केला. त्याप्रमाणे स्कॉलरशिप चालू झाली.

अनुक्रमणिका

पण दुर्देवाने असा एक फाटा पडला की, ति. रा. तुकाराम सिद्राम ढाले व गंगाराम ढाले (कझन) हे म्हणू लागले की, 'तू त्याच्याबरोबर कोल्हापूरला जाऊ नकोस. कारण ते काही तरी तुझा घात करतील. तुकाराम हा म्हणू लागला की, अथणीचा दुंडप्पा हा बेळगावास आहे. त्याची व माझी ओळख आहे तर तुला त्याच्याबरोबर घेऊन जाण्यास सांगतो व बेळगावच्या खुद्द डे.ए इन्स्पे. यांच्याकडून स्कॉलरशिप देवविण्यात सांगतो' असे म्हणताच मलाही मोठा आनंद झाला व बापासही बरे वाटून जाण्याचे बंद पाडले. तेव्हा निंगप्पा व जिवप्पा ऐदाळे त्या दिवशी पहाटेस निघून आले. मी सकाळी रावसाहेब गोखले यांचेकडे गेलो असताना ते फार माझ्यावर रागावले व म्हणू लागले की, 'तुझी स्कॉलरशिप बंद करतो. तुझी शिकण्याची इच्छा नाही असे मला वाटते. जर तू ह्या महिन्यात कोठेका होईना, शाळेत नाव घातलेस तर स्कॉलरशिप मिळेल नाहीतर मिळणार नाही असे म्हणताच माझी पाचावर धारण बसली व कोणाचे न ऐकता जाण्याचे ठरविले.

(मु. कोल्हापूर ता. ८।४।१९११)

**भाग १० वा**

रावसाहेब गोखले हे रागवल्यामुळे त्याच दिवशी म्हणजे जानेवारी १९१० मध्ये माझ्या बापास हिंगणगावापर्यंत घेऊन गेले. नंतर तेथून दुसऱ्या दिवशी हिरा मानीगांवकर यास मिरजेपर्यंत घेऊन आलो. मिरजेत त्या रात्री निजण्यास जागा चांगली मिळाली नाही. कसेतरी रात्र काढली व सकाळी गाडीत बसलो. मानीगावकर हा परत गेला. मी गाडीत कधीच बसलो नसल्यामुळे गाडीत मला मोठा आनंद झाला व झाडे पळालीसारखे पाहून थोडशी घेरी आल्यासारखी झाली. नंतर कोल्हापूर स्टेशनवर उतरलो व वावड्याची वाट धरली व कृष्णाच्या घरी पोहोचलो. भूक फार लागल्यामुळे लवकरच नदीत स्नान करून जेवण केले. नंतर कृष्णास बरोबर घेऊन कोल्हापूर बोर्डींगास गेलो व निंगप्पा व जिवाप्पास भेटून पुन्हा बावड्यास गलो व रावसाहब कदम याना बोर्डिंगात घेण्याबद्दल विचारले की, मला जतेकडून ३ रु. स्कॉलरशिप मिळत असते. ते म्हणाले तिकडून स्कॉलरशिप मिळाली तर काही हरकत नाही. तुला आम्ही बोर्डिंगात घेतो. पण त्यावेळी बोर्डिंगातील मुलांची पोटाची फार फजिती होती. कारण स्वयंपाकी नसल्यामुळे स्वतः करून हिरवे दुरवे खात असते, तेव्हा मला त्या दिवशी बोर्डिंगात यावेसे वाटले नाही. सुदैवाने लवकरच मानाई नावाची स्वयंपाकी मिळाली. तेव्हा २-३ दिवसानंतर मी बोर्डिंगात आलो. त्यावेळी रावसाहेब कदम ह्यानी मुलांची पोटाची करावी तशी व्यवस्था केली नव्हती. तेव्हा पोटाची थोडीशी तारांबळ होत असे. मला मास खाण्याची फार फार आवड असल्यामुळे रावजी कदम याना विचारले व त्याच्या पाठी लागून मटण देण्याची व्यवस्था केली. मला न समजता (किचन) स्वयंपाक घरात मी दररोज पायताण (वहाणां) नेत असे मग एके दिवशी मि. निंगप्पा ऐदाळे यानी मला त्याबद्दल बजाविले पण त्याचे मी ऐकले नाही. पुढे याने ति. रा. सावंत मास्तर (खासगी) त्याना सांगितली, माझ्यावर ते फार रागावले, तेव्हा क्षमा करा असे मी सांगितले व निंगीपास म्हणटले. तू वादी आहेस खरा खवटने खवटपणाने सांगतोस हे काही बरोबर नाही. पुढे काही दिवसानी मी सावंत मास्तरास सांगितले की तो आमचा वादी आहे. यामुळे काहीतरी सांगून माझा नाश करण्यास बघतात. खरोखर हे माझे सांगणे वाजवी नव्हते. जतेहून आल्यावर मी प्रथम राजाराम हायस्कूलमध्ये दुसरीच्या क्लासात बसलो. पण मला व्याकरण व गणित याची माहिती झाली नसल्यामुळे व ति. रा. सावंत (खाजगी) मास्तर यानी सांगितल्यामुळे व क्लास मास्तरांनी सांगितल्यामुळे १ लीत मी बसलो. मी १ ली बसल्या पासून माझा पुष्कळ फायदा झाला व बक्षिसे मिळविली.

अनुक्रमणिका

इंग्लिश मला जाचले नाही. पण रावसाहेब गोखले ह्या बद्दल काहीतरी म्हणतील अशी भिती होतीच पण ते काही बोलले नाहीत. कोल्हापुरात असतानाच तुकाराम ढाले यानी मला एक रुपाया पाठविला याबद्दल मी त्याचा आभारी आहे. व गंगाराम यानीही दोन अडीच रुपये दिले म्हणून त्याचाही आभारी आहे. व गंगाराम यानीही दोन अडीच रुपये दिले म्हणून त्याचाही आभारी आहे. पुढे एप्रिल महिन्यात सहामाही परीक्षा होऊन उन्हाळ्याच्या सुटीत जतेस गेलो. ते दिवस उन्हाळ्याचे असल्यामुळे मला चालण्याची पराकाष्ठा झाली. व कसे तरी आनंदपूर गाठले व गंगारामाजवळ दोन । तीन दिवस राहिलो. व जतेस गेलो. व पिरसाहेबाचा ऊरूस केला. उन्हाळ्याच्या सुटीत सिडलल्पा भरमप्पा केसरकर हा आजारी आहे. व जगण्याचा भरवसा नाही असे समजताच मी पिर साहेबास नवस केले की, सिडलाप्पा हा कोल्हापुरात येऊ दे म्हणजे तुला २॥ पैशाची साखर घालतो. त्याप्रमाणे खऱ्या देवाने माझे नवस सिद्ध केले. व मीही साखर वाटली. जिवाप्पाचे लग्न होत असताना मला जेवणास बोलावतील म्हणून मी खलाटीस निघून गेलो (पुतणी गौराबाई हीच्या लग्नास) पण त्याचे जेवण काही कारणाने मी जतेस आल्यावर झाले व मि. निंगप्पा हा बोलावण्यास आला पण आतीचे लोक काहीतरी म्हणतील म्हणून गेलो नाही. व मित्राचा मान मानला नाही. ह्याचा मला मागाहून पश्चाताप वाटला व माझे लग्न करण्याबद्दल माझ्या आईबापाना मी चांगलेच बजाविले. पुढे जून महिन्यात मी निंगप्पा व जिवाप्पा कोल्हापूरास आलो. व पुढे लवकरच कोल्हापुरी प्लेग आल्यामुळे जतेची वाट धरली. कळावे

(ता. १०-४-१९११ इ. मु. कोल्हापूर.)

**भाग ११ वा**

जतेस गेल्यावर थोड्याच दिवसानी माझे आईबाप मौजे मायफळ या गावास सुगी करिता निघून गेले. व मी मौजे पाच्छापूर एथे (साऊबाईच्या धरी) १५ दिवस राहिलो. व नंतर गंगाराम मास्तर आनंदपूर एथे १०-१२ दि. राहिलो. व गंगाराम-सिताबाई-रामा व मी-कृष्णा नदीच्या स्नानास गेलो होतो. परत आनंदपुरास आल्यावर बाप (सनवडी) येथे आजारी आहे असे समजताच ताबडतोब पाच्छापुराला निघून गेलो व तेथून लागलेच सनमडीस गेलो व बापास जतेस आणिले. जतेस ४ दिवस राहून पाच्छापुरास दोघेही १५ दिवस राहिलो. बाप आजारी असल्यामुळे औषधपाणी करण्यास मला फार परिश्रम करावे लागले. १५ दिवसापर्यंत माझा पाय धरणीला नव्हता. जत, मायफळ व पाच्छापूर या गावास एकसारखे फिरावे लागले, याबद्दल माझ्या बापास माया येऊन त्याने असे उद्‌गार काढले की, ‘बाळा माझ्यासाठी किती खटाटोप खातोस. ‘तू फार दमलास’ असे म्हणताच मला आनंद झाला. पुढे मेव्हणा गुराप्पा हा साऊबाईस रागराग करावयास लागला. तेव्हा आम्हास वाईट वाटून मी मायथळास जाऊन जी काही सुगी केली होती त्याचे दाणे करण्यास खटपट केली. कणसे बडवताना माझ्या हातास फोड आले व येत नाही असे लोक म्हणू लागले. तसे कसेतरी करून दाणे काढले व आईस सर्व मुलासह जतेस घेऊन आलो नंतर ३ महिने फुकट गेल्यामुळे रावसाहेब गोखले म्हणू लागल की, विनाकारण दिवस का घालवतोस, मुंबईस तरी जा. तेव्हा मी एक पत्र लिहीले पण तूर्त तरी जागा रिकामी नाही. असे आल्यामुळे जाणे रहित झाले व कोल्हापूरचा प्लेग बंद झाला आहे असे समजताच ता. १।१। १९११ इ. रोजी कोल्हापुरास निघून आलो व लवकरच वार्षिक परीक्षा (१ ली इयत्तेची) संपली व गणित, मराठी व हस्ताक्षर याबद्दल १२ रु. बक्षिस मिळाले.

## संकटे

माझ्या १ ली इयत्तेच्या ६ माही कार्डामध्ये मराठी विषयामध्ये ६६ मार्क मिळाले असून सेवेकरी मास्तर यांनी चुकून ६८ मार्क लिहिले होते. (खोडून) पुढे बक्षिसच्या वेळी जनरल बक्षिस जात आहे समजून ते कार्ड मी त्याना दाखविले. तोच रिझल्ट बुकामध्ये ६६ मार्क होते. मी त्यांच्यापाशी जरा उद्धटपणाने भाषण केले. तेव्हा ते म्हणू लागले की, तुला बोर्डिंगातून काढून टाकतो असे म्हणताच मी फार घाबरलो. तरी पण धैर्य सोडले नाही. पुढे मला सवेकरी मास्तर यानी मला विचारले तेव्हा मी खरे असेल ते सांगितले. खरोखर ही माझी चूक झाली नव्हती. पण ईश्वर मर्जी. पण सेवेकरी मास्तर यांच्याशी जरा उद्धटपणाने भाषण केले. त्याच्याबद्दल मी अपराधी आहे असे सांगितले तेव्हा त्यानी ही रावसाहेब ओळकर याना सांगितले की, ही त्याची चूक नव्हे असे सांगताच मला आनंद झाला. माझ्या त्या बोलण्याबद्दल सेवेकरीने क्यॉटलॉग रजिष्टरमध्ये 'दांडगेश्वर' असे लिहिले व अद्यापीही कार्ड दिले नाही. मीही मागावयाचेच सोडले आहे. ह्या त्याच्या खोडाखाडीबद्दल मला देसाई नावाच्या मुलाने सांगितले व पुढें तो संकटसमयी चुकवेल म्हणून त्याच्याकडून कबूली लिहून घेतले आहे.

कळावे.

मला एकदा रावसाहेब गोखले याच्याजवळ शिकत असता काळवीटीने फार घाबरे केले होते. तेव्हा मी जोर करून त्यास मारिले व निघून गेले. आणखी एक गोष्ट आठवते ती सांगतो. रावसाहेब गोखले यांच्याजवळ शिकत असताना विनाकारण पतकी नावाच्या मास्तराने रा. गो. याना सांगितले की, 'तुमच्याजवळ शिकण्यास येणाऱ्या महाराच्या मुलाने आमची मुले ओढ्यात खेळत असताना झऱ्यात थुंकला आहे' तेव्हा ते रागावून मला म्हणू लागले की, तुला मी शिक्षा करतो. तु फाजील व चावट मुलगा आहेस' तेव्हा मी सांगितले की ही गोष्ट माझ्या हातून झालीच नाही. तेव्हा त्यानी माझ्या समक्ष मास्तरास विचारले तेव्हा तो म्हणाला की, त्याच्या आठवणीत नसेल. तेव्हा लागलेच गोखले साहेबाने ओळखले व मला ओळखले. व मला भिऊ नकोस म्हणून सांगितले. मी सांगितले की असेच काहीतरी माझ्यावर कुंबाडपणा आणून आपली माझ्यावरची नजर बंद पाडावी म्हणून खटपट करता आहेत. अशा रितीने हे एक संकट पार पडले.

(ता. १३-४-११)

## भाग १२ वा

मला बोर्डिंगातील सेक्रेटरी नेमले आहे. तेव्हा तुकाराम मांग आळतेकर हा माझ्या विरुद्ध वागू लागला व कोणतीच गोष्ट ऐकेना म्हणून काहीतरी त्याच्यावर गुन्हा ठेऊन शिक्षा करवावी अशी इच्छा होऊन एके दिवशी जेवताना शिवू वकोस म्हणून सांगितले. परंतु तो न ऐकता उलट बोलू लागला व मी शिवणार असे म्हणू लागला. तेव्हा मी मे. ओळकर मास्तर यांचेकडे गेलो. त्यानी त्याला ताकीद दिली की, तू शिवलास म्हणजे तुला बोर्डिंगातून काढून टाकीन. बोर्डिगात आल्यावर तो म्हणू लागला की, मोडलिंबकर ख्रिस्ती आहे, त्याने शिवलेले कोणतेच आम्ही घेणार नाही. तेव्हा मुद्दाम त्यास शिवण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यानी शिवले व लागलेच तुकाराम यानी त्यास शिवले व तुकाने सगळ्या अन्नास शिवले ह्या स्पृशामुळे सर्व मुलाना माझ्याबरोबर उपवासी पडावे लागले. रावसाहेब ओळकर यांनी चौकशी करून

अनुक्रमणिका

गुन्हेगारास (तुकारामास) घरी जाण्याबद्दल आज्ञा केली तेव्हा तो घरी चालला पण त्याना दया येऊन ठेवून घेतले. खरोखर फक्त त्याची खोड मोडण्यासाठी हे सर्व मी केले. आम्हास पूर्वी मटण (रावसाहेब कदम) हे देत होते. पण एकदम बंद केले. त्यामुळे मला फारच वाईट वाटले. मी मासाचा फार शौकी आहे. मी रावसाहेब लट्ठे यांचेकडे अर्ज केला पण काही विचार झाला नाही. पुन्हा मॅनेजिंग कमेटीकडे अर्ज देण्याचा विचार आहे.

(१४-४-११ मु. कोल्हापूर)

आमच्या बोर्डिंगात रावसाहेब ओळकर मास्तर यांनी २।२ तास काम केले पाहिजे अशी ताकित दिली कारण तुम्ही महार असून आपापले काम शिकून विद्या शिकावयाची म्हणजे तुम्हास तुमच्या वाडवडिलांचे जे काम होते तेही आले पाहिजे. पण मी अतिशय अशक्त असल्यामुळे मला दोन तास निभवत नाही असे म्हणताच ते रागावले व तुला काढून टाकतो असे म्हणाले तेव्हा मला फार वाईट वाटून मन उदास झाले आहे.

(ता. १४-४-१९११ मु. कोल्हापूर)

मी सेवेकरी मास्तर याना तूर्त कमी केले; म्हणून त्यांच्या कृपाळूपणाबद्दल व वागण्याबद्दल मला आज फार वाईट वाटत आहे. मागे त्याच्याशी उद्दटपणाने बोलल्याबद्दल पश्चाताप झाला. पुन्हा त्याना नेमतील अशी ईश्वरास प्रार्थना करीत आहे.

(ता. १९-४-११ मु. कोल्हापूर.)

इंग्रजी १ ली इयत्तेत मराठी, गणित व हस्ताक्षर या प्रत्येकात १ ला नंबर आल्यामुळे प्रत्येकास ४ रु. प्रमाणे एकूण १२ रु. ची पुस्तके मिळाली. त्यांची नाव नावे–चिपळूणकर मराठी, याचे डिक्सनरी, चेंबर्सची इंग्रजी डिक्सनरी, नवनीत आपटे कृत गाईड, भांडारकर कृत संस्कृत १ ले, २ रे बुक टॉटस स्टुडन्ट्स मॅन्युअर गोळे यांचे १ ले संस्कृत बुक, आठवले यांचा आलजीब्रा व रघुवंश आणि कंपास पेटी एकूण ११ जिनसे मिळाली. असेच सर्वांच्या आशिर्वादाने काहीतरी यशवंत जाई अशी आशा करतो व ईश्वराची प्रार्थना करतो.

(ता. २१-४-११ मु. कोल्हापूर)

मला आज एक गोष्ट सुचत आहे ते इथे सांगतो. सभ्य व चांगल्या विद्यार्थ्याने अगर माणसाने कोणत्याही प्रकारे दुसऱ्याचे मन दुखवून आपल्या डोक्यावर पातक घेऊ नये. एखाद्या प्राण्याचा जीव मारणे काय आणि मनुष्याचे मन दुखविणे काय हे सारखेच. उदाहरणात – एखाद्या ब्राह्मणाला माहीत नसताना महाराने शिवले तर त्याचे पाप त्या महाराला लागणार नाही, पण जर तो महार ओळखीचा असला तर मात्र त्या ब्राह्मणाचे मन दुःखीत होऊन खरोखर ते पातक त्या महाराच्या डोक्यावर बसेल. ह्याकरिता प्रत्येक मनुष्याने दुसऱ्याचे मन न दुखविण्याबद्दल खबरदारी घ्यावी असे माझे मत आहे.

(ता. २२-४-११ मु. कोल्हापूर)

अनुक्रमणिका

मला आंबट पित्ताची बाधा असल्यामुळे वारंवार त्रास होत आहे. पुष्कळ औषधे केली पण काही बरे होईना. कधीतरी डोके दुखून उलट्या होतात. आज एक उलटी झाली.

(ता. २४-४-११)

मि. सेवेकरी मास्तर याना बदलीवर घेतले पण कायम नाहीत. कायम होतील अशी आशा आहे.

(ता. २२-४-११)

मला जी खोटे बोलण्याची व वाईट रीतीने वागण्याची (आमच्या जाती मध्ये) संवय होती, ती आता कमी होत चालली आहे व बरेच खोटे बोलण्याची संवय सुटत चालली आहे. असेच सर्व माझ्या अंगातील वाईट गुण घालविण्याचा प्रयत्न करीत आहे व ती लवकरच सिद्धीस नेईन अशी खात्री आहे. कळावे.

(ता. २६-४-११)

मी ती. रा. सावंत मास्तर यांच्याकडून कपड्यास तीन रु. घेतले होते. त्यापैकी दोन रुपये न मागताच मी दिले. व एक रुपया जतहून आलो म्हणजे देईन असे म्हणताच ते काही एक न म्हणता, 'ठीक आहे' असे म्हणाले. त्याच्या कृपाळूपणाबद्दल व उपकाराबद्दल मी आभारी आहे. सावंत मास्तर हे आमच्या बोर्डिंगचे खाजगी मास्तर होते. त्यावेळी माझा अभ्यास क्लासाच्या पुढे चालत होता. पण त्यांची जेव्हा शिकवणी बंद पडली तेव्हा मला दुःख झाले.

(मु. कोल्हापूर ता. ३०-४-११)

बापाने लग्नाबद्दल कर्जाऊ रुपये काढण्यासाठी पुष्कळ खटपट केली, परंतु कोणीच दिले नाहीत. लग्न करण्याचा सगळा महारवडाभर बोभाटा झाला व लग्न रहीत झाले असे वाटले, तेव्हा मीच ही गोष्ट मनावर घेतली व रुपये काढण्याच्या भरीस पडलो. व तात्काळ रुपये काढले. सातु महार याने माझ्या बद्दल कुड्या गहाण ठेऊन रुपये दिले. त्या बद्दल मी त्यांचा आभारी आहे. आणि ती. रा. गंगाराम कझन याने माझ्यासाठी ह्याकामी मेहेनत घेतली त्याबद्दल त्यांचाही आभारी आहे असे म्हटल्यावाचून राहवत नाही. लागलेच शनिवार ता. ३।६।१९११ इ. रोजी संध्याकाळी पाच वाजता लग्ने लागली (तांदूळ पडले) माझी वाइफ् नाव पितांबरा अजमासे ४ वर्षाची असेल. लहान झाली ही मोठी चांगली गोष्ट आहे. माझा अभ्यासही पुरा होईल. बायकोचे माहेर मोजे सोरनांदगी (स. जत) कर्ज केव्हा फिटेल ह्यासाठी मोठी काळजी लागली आहे. अन्यखर्च काढण्याबद्दल खटपट करीत आहे. कळावे.

(जत ता. १३-६-१९११)

इथे आल्यापासून मन थोडेसे उदास झाले आहे. पुस्तकाकडे पहावतसुद्धा नाही. अभ्यास करण्याची इच्छा पुष्कळ करीतो पण नाईलाज आहे. फक्त निजून व बसून दिवस चालले आहेत.

अनुक्रमणिका

कोणाबरोबर भांडण-तंटा काढू नये व दुसऱ्याने बोलल्याने सहन करून घ्यावे अशी इच्छा होती, पण प्रत्येक मनुष्याच्या अंगी ईर्षा उत्पन्न होते व कोणाचे जास्त होऊ देऊ नये म्हणून त्याच्या तोंडास लागावे लागते, ह्याप्रमाणेच काल एक गोष्ट आमच्यामध्ये घडून आली व मागाहून पच्छाताप झाला.

जत ता.सदर

कोल्हापूरहून रविवार ता. ७-६-११ रोजी निघून ता. ९-६-११ रोजी जतेस पोहोचलो. वाटेने येताना उन्हाच्या त्रासाने बरेच दुःख झाले; आणि ओझेही बरेच त्रासदायक होते. घरी येताच घरच्या माणसानी साऊबाई बहिणीचा जीव जाऊन जे दुःख तिला झाले होते ते समजताच मला मोठे दुःख झाले व लहानपणच्या आमच्या वनवासास आठवून अतिशय दुःख झाले. असो. ईश्वर मर्जी.

(मु. जत, ता. १३-६-११)

माझे लग्न करण्याची आई-बापाना इच्छा आहे व कर्ज काढण्यास तयारी आहेत, पण माझे नको आहे. परंतु आमच्या ह्या लहानपणीच व कर्जभरी होऊन जी लग्न करण्याची पद्धत पडली आहे ती तोट्याची आहे. ह्या जातीधर्माबद्दल शिवाय रोख ३०-३९ रुपये लागले. घरभरणीच्या वेळेला ३० रुपयाचा खर्च लागेल. ८-९ पायली गहू, ३ पायली डाळ, एक मण मूग, एक पायली तांदूळ लागली. एकूण ६० रुपये खर्च झाला. कळावे.

(ता. ६-६-१९११ इ. मु. जत)

गुरुवार ता. ८-६-१ ११ इ. रोजी कोल्हापूरास (पहाटेस) येण्यास निघालो. निघताना वाटेत साप आडवा होता. तो पाहताच सर्व लोक म्हणू लागले, ‘आडवा काळ आला आहे, करिता आज जाऊ नको.’ असे म्हणताच मी मोठ्या विवंचनेत पडलो. शुक्रवार हा माझा घातवार असल्यामुळे व बेंदूरजवळ आल्यामुळे जाणे लवकर होणार नाही म्हणून लागलेच पीर साहेब मेबुसुबाना यास पाच पैंशाची साखर वाटली व घरच्या माणसाची व बापाचीही खुषीने परवानगी घेऊन निघालो. वाटेने पावसाच्या त्रासाने थोडे हाल झाले, असो.

ता. १०-६-११ रोजी कोल्हापूरी सुखरुप पोचलो. कळावे

(ता. ११-६-१९११ इ. मु. कोल्हापूर)

इथे आल्यापासून आई-बापाच्या व बहिणी भावंडाच्या ताटातुटीमुळे मन उदास झाले आहे.

(ता. १२-६-११ मु. कोल्हापूर)

काल रोजी एक मॅट्रिक झालेला मुलगा एकादशी निमित्य नदीस आंघोळीस गेला होता. त्यावेळी तो बुडून अदृश्य झाला. ह्याबद्दल मनास फार दुःख झाले त्याने इतके दिवस किती तरी दुःख सोसले असेल

अनुक्रमणिका

व त्याच्या शिकण्याची काही एक फायदा न घेता बिचारा मेला म्हणून मनास वाटतें की, आपणही विनाकारण त्रास घ्यावयाचा व शेवटी मरून जायाचे, तेव्हा हा त्रास जिवास न देता बसावे हेच बरे!!

मनुष्य प्राणी जन्मास येणे हेच व्यर्थ आहे असे म्हटल्या वाचून राहवत नाही. असो ईश्वरमर्जी.

(ता. ८-७-१९११)

मी ईश्वररोपदेशाला जात असल्यामुळे माझ्या मनास जो काय ईश्वराविषयी उपदेश झाला आहे त्यास अनुसरून मी आजपासून ईश्वर प्रार्थना करण्याचे मनावर घेतले आहे. खरोखर!!! आपणा सर्वास ज्याने उत्पन्न केले आहे, व ह्या जगावर नानाविध प्राणी, डोंगर, समुद्र, झाडे-झुडपे इत्यादी व सूर्य-चंद्र, चांदण्या वगैरे ज्याने उत्पन्न केले आहे आणि आम्हास ज्याने बुद्धि व वाचा दिली आहे, अशा ह्या खऱ्या देवास सोडून आम्ही मूर्खपणाने त्याचे नाव न ठेवता आपल्या मुलाबाळात, आई-बापात, आप्तात व संसारात गुंग होतो ही किती दुःखाची गोष्ट आहे. आणि हे अज्ञान लोक एखादा धोंडा (तो लगबी बललेला का असेना) घ्यावयाचा व त्याला ठोके मारून मूर्ति करण्याची व त्याला देव म्हणावयाचा अशी जी आम्हामध्ये चाल पडली आहे ही मोठी चूक म्हटल्या वाचून बहुतांशी राहवत नाही. खरोखर म्हटले असता देवाला जर इंद्रिय असते तर आमच्यात आणि त्याच्यात अंतर काय? काही नाही तर मग त्याला इंद्रिय नाही हे निश्चित आहे.

(ता. १०-७-१९११)

मी लिहून जितके मार्क घेईन तितके तोंडी घेता येत नाही. ह्यासाठी मला वाईट वाटते. असो खटाटोप करणे आपणाकडे.

(ता. १२-७-११)

मी आज तीन दिवसांपासून आजारी असल्यामुळे व घरचे कर्जाचा तगादा लागला आहे असे पत्र आल्यामुळे मन अतिशय उदास झाले आहे व अन्न पुरेसा जाईना. हे शिकणेही काही बरे नाही असे वाटू लागले आहे. आईबापाजवळ असणे हे बरे. इथे कोणी विचारणार-पुसणारा नाही. ह्यामुळे एकदा जतेस जावे असे वाटत आहे. तरी पण तसेच मनास धीर घेत आहे व शाळेस जात आहे.

(ता. २२-७-११)

क्लासात ड्राइंगचा तास असल्यामुळे व ड्राइंग शिकलेच पाहिजे असे असल्यामुळे जरी मला त्यांचा कंटाळा वटतो. तरी पण मी खटपट करीतो. पण काही जुळत नाही. तेव्हा हे काम जुळण्यास परमेश्वर यश देईल अशी प्रार्थना करीतो.

(ता. २८-७-११)

आम्हा बोर्डिंगावार मेहेरबानी करून मि. तात्याबा पाटील (जैन बोर्डिंगातील विद्यार्थी) हे सवडीनुसार येऊन जे आम्हास उपदेशपर शब्द सांगतात व आम्हास सन्मार्ग दाखवितात व आम्हास

अनुक्रमणिका

बोलण्याची प्रॅक्टिस करवितात त्याबद्दल मी व सर्व स्टुडंटस् आभारी आहोत. आणखी ह्या कृपाळू मित्रानी आम्हास खेड्यानी घेऊन जाऊन काही आमच्या ज्ञातबांधवाकडून फंड गोळा करण्याची इच्छा उत्पन्न करून काल रोजी आम्हापुढे मांडली व आम्हीही माना डोलविल्या. त्याप्रमाणे एखाद्या सवडीवर हे आम्हास घेऊन जातील व काही सुदैवाने फंड गोळा होईल तर आम्ही खरोखर त्यांचे ऋणी झाल्यावाचून राहाणार नाही.

हल्ली आमच्या गरीब बोर्डिंगात असावी तितकी मुले नाहीत ह्यामुळे मला दुःख वाटत आहे. तरी ह्यापेक्षा जास्त मुले वाढविण्याचे जरी आमच्या अंगी सामर्थ्य नाही, तरी अशा प्रकाराने भिक्षा मागून तरी मुले वाढविण्याची शक्ति आम्हांस ईश्वर देईल अशी देवास प्रार्थना करीतो.

(ता. ३०-७-११)

काल संध्याकाळी मि. तात्याबा पाटील यांनी 'प्राण्यावर दया' या विषयावर भाषण केले. ते म्हणाले, 'जो प्राणी संकटात पडलेला असेल त्यास आपल्या हातून जितकी मदत होईल तितकी करून सोडविण्याचे आपले देवाने दिलेले मुख्य कर्तव्य आहे. जसे आपणास लोक मदत करतात तसेच आपणही केले पाहिजे. जसे आम्हांस एखादे वेळेस त्रास झाला असताना दुःख होते. तद्वत् मुक्या जनावराना का होऊ नये? असे असता सुद्धा ही माणसे गाई. मेंढी वगैरे प्राण्यांना मारून खातात हे ईश्वरास बरे वाटेल काय? नाही! तर मग असे जे घात करतात ते सोडून देणे योग्य नाही काय? अर्थात आहे. तरी तुम्ही होता होईल तितके करून मांस खाणे सोडून द्या.'

तेव्हा आताच्या वेळेस माझ्या मनाने घेतले आहे की, ईश्वराने ह्या जगामध्ये जे काय निर्माण केले आहे ते सर्व मनुष्यासाठीच. ज्या प्रमाणे अन्न आहे. त्याप्रमाणेच ते पौष्टीक अन्न आहे. तेंव्हा मांस खाणे हेच बहुतांशी बरोबर आहे, असे माझे मत आहे. कळावे.

(ता. ६-८-१९११)

काल रोजी मि. पाटील यांनी 'सवय' या विषयावर भाषण केले. ते म्हणाले, 'कोणत्या का प्रकारची वाईट अगर चांगली सवय लावून घेण्यास कारणीभूत आपणच होतो, तर जी चांगली गोष्ट असेल तिची सवय करून घेण्यास चुकू नये. उदाहरणार्थ – पहाटेस उठण्याची सवय जर आपणास नसली तर ती सवय लावून घेण्यास थोडे दिवस जाचेल. पण पुढे ती एकदा सवय लागली म्हणजे काही वाटायचे नाही. तसेच कच्चा अभ्यास करण्याची सवय असल्यास ती सुधारावी. असे पुष्कळ उदाहरणे देऊन आपले भाषण पुरे केले.

मला जी वाईट सवय होती ती काढून टाकण्याची खटपट करीत आहे. मी प्रत्येक गोष्ट करताना चांगल्या सवयीची आठवण करून देऊन त्याचप्रमाणे वागण्याची खटपट करीत जाईन. हा कित्ता घालून दिल्याबद्दल मि. पाटील यांचा मी आभारी आहे.

(ता. १३-८-१९११)

अनुक्रमणिका

काल संध्याकाळी मि. पाटील यांनी, 'आईबापाबरोबर व मित्राबरोबर कसे वागावे.' या विषयावर भाषण केले. 'आईबापांनी आम्हास जन्म दिला आहे व लहानाचे मोठे करून जगामध्ये कळण्यास सामर्थ्य दिले. तेव्हा त्यांची देवाप्रमाणे भक्ति व सेवा केली पाहिजे.' इत्यादि अनेक उदाहरणे देऊन भाषण पुरे केले.

मी मागे थोडेसे मातेशी उद्धटपणाचे भाषण केल्यामुळे (ते मागे दिलेच आहे) मला पुन्हा फारच पश्चात्ताप झाला व ईश्वरापाशी त्या गुन्ह्याची माफी मागीतली. कोणतीही गोष्ट आई-बापांनी सांगितली तरी मोडू नये व जर आपल्या फायद्याची असेल तर त्यांना बोध करून त्यांची समजुत घालून द्यावी. उदाहरणार्थ, 'मला माझे आई-बाप जेव्हा मी कोल्हापूरास इंग्रजी शिकण्यास निघालो तेव्हा ते नको म्हणत असत. तेव्हा त्यांची आज्ञा मी मोडून आलो नाही व त्यामुळे माझा फायदा झाला तो हा की, - मला पूर्वी ३ रु. मिळत होते. त्यांच्या आज्ञेवरून मी इकडे न येता तेथच्या श्री. डफळे सरकार यांच्याकडे तीच स्कॉलरशिप परगावी चालविण्याबद्दल अर्ज करताच मला माझ्या अर्जाप्रमाणे व्यवस्था केली. खरोखर ही स्कॉलरशिप (३।—रु.) मिळाली त्या त्यांच्याच आशिर्वादाने म्हणून आई—बापाची आज्ञा अवश्य पाळली पाहिजे.

ति. रा. रामचंद्र सावंत मास्तर हे बरेच दिवस खासगी शिकवण्यास येत नव्हते. ते आजपासून येणार हे पाहून मला फार आनंद होत आहे.

(ता. २०-८-११)

या खेपेस जतेहून आल्यापासून जिवास काहीतरी त्रास (दुःख) होतच आहे. व ति. रा. ओळकर मास्तर व सावंत मास्तर हेही मला वाईट होत चालला आहे, असे म्हणू लागले आहेत. ह्याचे कारण की; (आमच्या) बोर्डींगातील मुलांमध्ये जमून येईना व काहीतरी तक्रारी होत आहेत तेव्हा आजपासून कोणास काही कपटपणाने व वाईट शब्दाने न बोलण्याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे. जतेहून येताना आडवा साप गेला व लोकांनी जाऊ नको म्हणून सांगितले पण न ऐकता आलो व त्यामुळेच अशी दुःखे होत आहेत असा संशय बाधत आहे. तेव्हा हा संशय काढण्यासाठी वार्षिक परिक्षा झाल्यानंतर घरी जाऊन येण्याचा बेत आहे. पण ईश्वरमर्जी.

(ता. ७-९-११)

काल रोजी जतेचे पत्र आले. त्यात उंदीर पडत आहे असे वाचून मन उदास झाले आहे. असो ईश्वर मर्जी ता. (२१-९-११) आक्टोबर चार पासून वार्षिक परिक्षा सुरू होऊन संपली. ता - नाही.

माझ्या लग्नाच्या बाजीमुळे जीवास फार काळजी लागली आहे. ति. रा. सावंत मास्तर अगर ओळकर मास्तर यांच्यापैकी एकजण तरी येतील अशी पूर्ण आशा होती. पण आज इतके काय निराशा झाली आहे की, सावंत मास्तर म्हणाले 'मजजवळ पैसे नाहीत व आळेकर मास्तर म्हणाले की, तू विद्यार्थी असल्याकारणाने तुला पैसे देता येत नाही. तू असल्या भानगडीत पडू नकोस. ह्या गोष्टीबद्दल मी पिरास नवससुद्धा केले आहे. पण पीर यश देत नाही. माझ्याबद्दल आई—बापास संकटास पाडले. ह्याबद्दल मला फार दुःख झाले इतके काय मन दुःखीत झाले आहे. ते स्पष्ट एथे लिहिण्यास लेखनी चालेना. मन अगदी थाऱ्यावर नाही

अनुक्रमणिका

(ता २४-६-११ मु. कोल्हापूर)

वार्षिक परिक्षा संपली. ता. १२-१०-११ रोजी कोल्हापूराहून निघून ता. १४-१०-११ रोजी शेडबाळ, मंगसुळीवरून जत मुक्कामी सुखरुप पोहोचलो. रोगराई काही नाही ही गोष्ट बरी झाली.

(ता. १७-१०-११ मु. जत.)

ह्या घरच्या गरीब परिस्थितीमुळे मन इतके कष्टी झाले आहे की, ते काय एथे लिहिता येत नाही. लोकांच्या कर्जामुळे व घरच्या पोटापाण्याच्या तारांबळीमुळे हे शिकणे बंद पाडावे व काहीतरी कामकाज करून पोट भरावे असे वाटत आहे. मोठ्या विवेचनात पडलो आहे. (ता. २३-१०-११ मु. जत.) शाळा सुरू झाली असेल असे वाटून कोल्हापूरास निघण्याचा बेत ठरविला. पण पगाराचे बील मंजूर अद्यापी (म्हणजे ता. ११-११-११ इ. पर्यंत) न झाल्यामुळे पगार मिळाला नाही. गाडीखर्च पाहिजे होता. व पंचेही नव्हते म्हणून पगाराची वाट पहात होतो. आता काय करावे म्हणून तसाच रावसाहेब गोखले यांचेकडे गेलो व ही सर्व हकिगत सांगितली. तेव्हा त्यानी मला पगाराऐवजी ३। - रु. दिले व पंचा व एक सदरा दिला. तेव्हा मी फार खूष होऊन घरी आलो. लागलेच सकाळीच म्हणजे रविवार ता. १२-११-११ इ. रोजी गोविंदसह निघालो.

आज डोके दुखत आहे. तापही आला आहे. दवाखाण्यात गेलो होतो. तेव्हा डॉक्टर म्हणालें, 'तुम्ही नेहमी आजारी असता तेव्हा एक महिना औषध सारखे घ्या.' करीता आजपासून औषध सुरु केले आहे.

(ता. १३-१-१९१२)

म्यानेजिंग कमिटीने ठरविल्यावरुन आम्ही बोर्डींगातील मुलाना संध्याकाळी व्यायामा ऐवजी दोन तास काम केले पाहिजे. तेव्हा बोर्डसना काम होत नाही अगर लाकडे फोडण्याचे होत नाही असे म्हणून बोर्डींगच्या बाहेर ता. १६-१-१२ सर्वच पडले. व आम्ही घरी जातो म्हणू लागले. त्यांच्या संगतीने व नादाने मीही बाहेर पडलो. दोन –तीन दिवस पोटाची फजिती झाली. दोन–तीन दिवसांनी मे. ओळकर मास्तर बोलावतील अशा आशेने राहून व शेवटी न बोलावणे आल्यावरुन आपापल्या घरी काही मुले निघून गेली लागलीच मी मे. ओळकर यांच्याकडे माफीचा अर्ज ता. १८-१-१२ इ. रोजी दिला. व १९-१-१२ तारखेपासून त्यांच्या मार्फत खानावळीत जेवू लागलो. मि. शिल्लापा केरुरकर हे कंप्यानियन मिळाल्यानंतर आज रोजी बोर्डीग हाऊस ओपन केले.

(ता. २१-१-१३.)

बापही हिंगणगावापर्यंत घालवित आला होता. तिघे २ दि. राहून ता. १५-११-११ इ. रोजी कोल्हापूर येथे रात्री सुखरुप पोहोचलो.

(ता. १७-११-११ मु. कोल्हापूर.)

अनुक्रमणिका

ह्या घरच्या अडचणींमुळे पगारातून पैसे घेऊन पत्रे वगैरे खर्च करणे होत नाही. असा विचार येऊन काहीतरी दुसरे काम पत्रा कागदा पुरते तरी करावे असे वाटून मे. पिसाळ (विश्व बंधू छापखाण्याचे मालक) याना गावात पत्रे वाटण्याची जागा द्यावी असे विचारले. तेव्हा त्यानीही मज गरीबावरती मेहेरबानी करून पत्रे वाटण्याची सवड काढून दिली. व आज पासूस वाटीत आहे.

(ता. २७-११-११ मु. कोल्हापूर)

**भाग १३ वा**

आज रोजी मे. ओळकर याजकडून वेळेवर पैसे न मिळाल्यामुळे दिवसभर उपाशी पडावे लागले. तशात आज मोहरमचा दिवस असून जिकडे तिकडे आनंद चालला आहे. व आमची ही स्थिती झाली आहे ह्या बद्दल फार दुःख झाले आहे. व शिकणे काही बरे नाही असे वाटत आहे. संध्याकाळी ४।५ वाजता जेवण मिळाले.

(ता १-१-१२ मु. कोल्हापूर)

कालच्या सारखाच आजही सेक्रेटरी कुरणे याच्यावर मुलांच्या हयगयमुळे उपासाचा दिवस प्राप्त झाला आहे. आजतर एकच वेळ संध्याकाळी जेवण मिळाले. फार वाईट वाटते.

(ता. २-१-१२)

माझ्या इ. २ री इयत्तेच्या परीक्षस मराठी, इंग्लिश, अक्षर व एकूण बेरजेत प्रत्येकी १ ला नंबर आल्यामुळे एकूण १७।– रु. चे बक्षिस मिळाले. मे. प्रिन्सीपॉल साहेब (डार्बी) यांनी मजवर मेहेरबानकी करून १७।–रु. रोख दिले. ह्या बद्दल मी त्यांचा आभारी आहे.

(ता. ८-२-१९१२ इ. मु.)

आज रोजी १७।– रु.ची मनिऑर्डर बापाच्या नावे केली. ता. ९-२-१२ माझ्या लग्नाचे कर्ज फेडले असे घरचे पत्र आज आल्यामुळे मला समाधान वाटले.

(ता. १६-२-१९१२)

सहामाही परीक्षा संपल्यावर रविवार ता. १४-४-१२ रोजी निघून तारीख १६-४-१२ रोजी (मंगळवारी) जत एथे सुखरुप पोहोचलो. घरी शेळी असल्यामुळे रोज दूध घेण्यास सुरुवात केली आहे. ही गोष्ट माझ्या अशक्तपणास शसक्त होण्यास मदत मिळाली म्हणटली पाहिजे.

(ता. १८-४-१२)

मी इंग्रजी शिकतो आहे व हुशारीमुळे बक्षिस वगैरे काहीतरी मिळते आहे हे बघवेनासे होऊन सुभाना ऐदाळे यांनी माझ्या बापाबरोबर भांडण काढून ‘तुझा मुलगा इंग्रजी शिकतो आहे व शहणा होत आहे, ही गोष्ट

अनुक्रमणिका

चांगली नाही. तरी त्याचे शिकणे बंद पाड. नाहीपेक्षा त्याचे शिकणे बंद पाडणे अथवा अपघात करणे माझ्या हाती आहे' असे म्हणाला. मग त्याचा उद्देश काय आहे कोण जाणे. या भितीमुळे माझे आई–बाप इकडे पाठविण्यास बिलकूल संमती देईनात. शेवटी मोठ्या कष्टाने परवानगी दिली व ता. २-६-१२ रोजी निघून ३ तारखेस एथे आलो.

(ता. १२-६-१२)

जतेस कॉलरा असून बहिण साळूबाईस मंगळवार ता २५-६-१२ रोजी कॉलरा उत्पन्न होऊन बुधवारी रात्री ४-०० वाजता देवाज्ञा झाली असे घराकडून पत्र पाहून जीवास फार दुःख झाले. असो ईश्वर मर्जी. ता. ३०-६-१२ कोल्हापूर. मे. प्रधान ह्यांनी मेहेरबानी करून एक कोट व एक शर्ट दिला. कॉलरामध्ये वडिल यशवंत विठू ढाले हे शनिवार ता. २९-६-१२ रोजी संध्याकाळी वारल्याचे आज रोजी पत्र पाहून जीवास अत्यंत दुःख झाले आहे. मन थाऱ्यावर नाही. असा दुःखाचा प्रसंग आजपर्यंत जन्मात कधी मजवर गुदरला नव्हता.

घरी जाण्याची इच्छा वाटते आहे. परंतु तेथे सध्या कॉलरा सुरु असल्यामुळे जाऊ नये असे लोकांचे म्हणणे आहे. असो ईश्वर मर्जी !!!

(ता. ४-७-१२ इ.)

कॉलरा बंद आहे असे समजल्यावरुन ता. १३-७-१२ रोजी निघून ता. १४-७-१२ रोजी जतेस पोहोचलो. मला पहाताच आई वगैरे फार दुःख करू लागले आहेत. त्याचे समजूत मीही करीत आहे.

चि. निंगप्पा ति. रा. गंगाराम हे म्हणतात की, 'आता तू कोल्हापूरला न जाता येथेच शिकण्याची सोय कर.' म्हणून त्यांनी पुष्कळ अडथळे करीत आहेत परंतु येथे राहिल्यास माझे शिक्षण चांगल्या रितीने होणार नाही. अशी त्यांचे खात्री करून दिली. व तिकडे जाण्याचा बेत करीत आहे. माझी स्कॉलरशिप जास्त वाढविण्यासाठी श्रीमंत डफळे सरकार यांचेकडे गेलो. ते म्हणाले, 'कारभारी यांचेकडे अर्ज कर.' तेव्हा मे कारभारी याना तोंडीच विचारले. तेव्हा ते म्हणाले तूर्त सवड नाही.' लागलेच त्याचे सर्वाचे वचन घेऊन ता. २४-७-१२ रोजी निघून ता. २५-७-१२ रोजी सुखरुप येऊन पोहोचलो. मुलांचा अभ्यास पुढे गेल्यामुळे अभ्यासाची मेहनत केली पाहिजे.

(ता. २६-७-१२)

केव्हा केव्हा तरी घराकडील आठवण झाली म्हणजे जीवास फार दुःख होऊन मोठ्या काळजीत पडतो. वडिलानी माझ्या शिक्षणासाठी फार श्रम घेतले होते ते माझे मलाच माहित. एखाद्या दिवशी मला कागदा वगैरेची गरज पडली की, घरी उपाशी का रहाणे का होईना पण माझी अडचण दूर करीत.

एखाद्या ब्राह्मणासारखे आपल्या मुलास विद्या शिकविण्याच्याकामी तसदी घेत असत त्यांचे नाव रहाणेसाठी थडगे बांधण्याचा माझा विचार आहे. हा विचार ईश्वर सिद्धीस नेवो. मी जन्मल्यापासून त्याचा हुकमाचा अगर कोणत्याही गोष्टीच्या बाहेर वागलो नाही.

अनुक्रमणिका

(ता. १५-७-१२)

चि. रा. निंगप्पा लहान बंधू हा विचाराने व शिस्तीने वागत आहे हे पाहून मला फार आनंद वाटत आहे.

(ता. १५-७-१२)

काही दिवस जतेस गेल्यामुळे माझा अभ्यास मागे पडला आहे व पडत आहे. ह्यामुळे ति. सावंत मास्तर व ओळकर मास्तर हे नांवे ठेवित आहेत. करिता जास्त मेहनत घेतली पाहिजे असे वाटते.

(ता. १९-८-१२)

क्लास फेलो कृष्णा गायकवाड ह्यानी मजवर कृपा करून स्टेशनरी सामान व एक धोतर दिले. त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. सुदैवाने यंदाच्या ३ री इयत्तेच्या वार्षिक परीक्षेमध्ये १ ला नंबर आला. व तिन्ही इयत्तेच्या मार्कांत १ ला नंबर आल्यामुळे मे. डार्बीसाहेब याने १० रु. चे घड्याळ बक्षिस दिले.

(ता. २२-१०-१९१२)

आज रोजी मराठा बोर्डींग हाऊसमधील काही कनवाळू मित्राने सक्तीनुसार मदत केली. याबद्दल या सर्वांचा आभारी आहे. त्यांची नावे खाली लिहिल्याप्रमाणे :

| | | | |
|---|---|---|---|
| १ रु. | पाटील एस. एस. | ϭ≤ | पडवळ के. बी. |
| ·॥· | देसाई जे. बी. | ϭ≤ | लाड |
| ·। = | यादव ब्रदर्स | ϭ≤ | बंडूभाई तांबोळी |
| ϭ≤ | तोडरमल व्ही. जी. | ϭ≤ | सावंत एस. एच |
| ϭ≤ | निंबाळकर आर. व्ही. | ०— ॥। | मराठे एन्. जी |
| ϭ≤ | सर देसाई बी. एन्. | ϭ≤ | सावंत आर. व्ही. |
| ϭ≤ | घाटगे के. बी. | ०— | तावडे एस्. एम्. |
| ϭ≤ | शिंदे आर. बी. | ३.।. ॥। | इतके पैसे त्याने दिले. |

(ता. २३-१०-१९१२)

आज रोजी क्लास फेलो शंकर विनायक जोशी यानी कृपाळू होऊन ॥·आणेचे पैसे दिले, याबद्दल त्याचे आभार मजवर झाले आहे. आणि अशा क्लास फेलोने मदत केली म्हणजे मोठी आनंदाची गोष्ट म्हणटली पाहिजे.

(ता. २४-१०-१२)

अनुक्रमणिका

ता. ६-११-१२ रोजी निघून ता. ७ रोजी जतेस सुखरुप येऊन पोहोचलो. घरी बाप एक बहिण नसल्याकारणाने उपयोग्य झाले. असो ईश्वर मर्जी!!

यंदाच्या साली पिके बरी नसल्यामुळे धारण फार महाग म्हणजे ६।७ शेर आहे. यामुळे कुटुंबाचा उपासमार होणार म्हणून मनी दुःखीत झाले आहे.

(ता. १२-११-१२)

ता. २७-११-१२ रोजी निघून संध्याकाळी हिंगणगावास वस्ती करून ता. २८-११-१२ रोजी सुखरुप पोहोचलो.

(ता. १९-११-१२)

**भाग १४ वा**

ता. २४-१२-१२ रोजी येथून जतेस ता. २८-१२-१२ रोजी सुखरुप पोहोचलो. नाताळच्या सुट्टीनंतर जत्रा असल्यामुळे व स्कॉलरशिप वाढविण्याबद्दल डफळे सरकारकडे विनंती करण्याबद्दल ता. ११-१-१३ पर्यंत जतेस रहाणे भाग पडले. ता. ७-१-१३ रोजी डफळे यांचेकडे अर्ज केला. ११-१-१३ रोजी ति. रा. तुकाराम सिद्राम ढाले व मरेप्पा याजबरोबर त्याच दिवशी रात्री मंगसुळीस पोहोचलो. वाटेने चालण्याच्या श्रमामुळे फार त्रास झाला. पुढे सोमवार रोजी संक्रात असल्यामुळे राहून ता. १४-१-१३ रोजी दुपार ३ वाजता बोर्डिंगमध्ये हजर राहिलो. तुकाराम यांनी १ नवे धोतर व सदऱ्यास सेलेचे कापड व नादुरुस्त घड्याळ दिल्याबद्दल मी त्याचा आभारी आहे.

(ता. १४-१-१३)

बहिण बाळाबाई उर्फ विठाबाई (वय ४ वर्षे) ही आडात पडून मेली असे आज पत्र वाचून मन अगदी दुःखात पडले आहे. यंदा आमच्या पाठी साडीसातीने पाठ घेतली आहे. असो ईश्वर मर्जी!

(ता. २८-१-१९१३)

मला सी. डिव्हिजन मध्ये ठेवल्याने ती. रा. पुजारी हे. मा. यांना ए डिव्हीजन मध्ये घालण्याबद्दल विनंती केली. परंतु त्यांनी विनंती मान्य केले नाही.

(ता. ४-२-२३)

शेवटी ए डिव्हिजनमध्ये घातले. ता. २५।२।१३. मला ओळकर मास्तर हे वरचेवर तू वाईट आहस असे म्हणतात. ह्याचे कारण काही समजत नाही. मी काही एक चूकही करीत नसून विनाकारण दोष देतात ही गोष्ट बरी नाही. असे वाटून, बोर्डींग सोडून जाण्याचा विचार करीत आहे

(ता. ९-२-१३)

चि. रा. निंगप्पा हा आजारी पडला आहे. ताप येत असतो. असे घराकडून मातोश्रीचे पत्र आले. यामुळे जीवास फार काळजी लागून जीव उदास झाला आहे.

(१०-२-१३)

चि. रा. निंगप्पा यास बरे वाटत आहे. असे पत्र आल्याबरोबर काळजी नाहीशी झाली आहे.

(ता. १२-३-१३)

पुनः आजारी पडून ताप येत आहे असे पत्र वाचून जीव काळजीत पडला आहे.

(ता. २६-३-१३)

चि. निंगाप्पास चांगले वाटत आहे. (ता. २।४।१३) येथील राजाराम हायस्कूलमध्ये टरमिनल अन्युवल परिक्षेत ४ नंबर पर्यंत येणाऱ्या मुलास एक टर्म मध्ये दर महा ४।-रु. प्रमाणे स्कॉलरशिप मिळते. यंदाच्या सहामाही परीक्षामध्ये इंग्लिशचा पेपर उलटून न पाहिल्यामुळे ५ वा नंबर लागून स्कॉलरशिप गेली. त्याबद्दल वाईट वाटते. असो ईश्वर मर्जी !

(ता. १९-४-१९१३)

ती. होळकर मास्तर हे उन्हातान्हात दिवसभर कामास लावीत असल्यामुळे जीव कासावीस होऊन अतिशय अती त्रास होत आहे. याशिवाय त्याचे माझे पटत नसल्यामुळे बोर्डींग सोडून जावे असे मनास वाटत आहे. पण तसे केल्यामुळे नुकसान होईल वाटते.

ता. २३।४।१९१३ रोजी कोल्हापूरहून निघून जतेस ता. २५।४।१३ रोजी सुखरुप पोहोचलो. वाटेने उन्हाच्या त्रासाने बराच त्रास झाला.

(ता. २६-४-१९१३)

जतेहून ता. ५।६।१३ निघून मंगसुळी वरून रोडबाळ पर्यंत मरेप्पास संगती घेऊन कोल्हापूरी ता. ७।७।१९१३ रोजी शनिवारी सुखरुप येऊन पोहोचलो. (ता. ७।७।१३) येथाल बोर्डिंगच्या त्रासामुळे कोठेतरी बाहेर राहून अभ्यास करावा या इच्छेने जतेच्या महाराजाकडे जाऊन स्कॉलरशिप वाढविण्याविषयी तोंडी सांगितले. त्यांनी दयाळू होऊन लागलेच मे. ति. रोडेकर कारभारी यास एक माझ्याजवळ २ रु. वाढविण्याबद्दल चिट्टी दिली. कारभारी यानी पुन्हा लागलेच महाराजाने कळविले की त्याच्याबद्दल कोल्हापुराहून काही बातमी आणावयाची आहे. ती आली म्हणजे मागाहून काहीतरी कळवू. येथे येऊन पहातो तो त्यांनी आमच्या बोर्डींगाच्या सुपरि. ओळकर याजकडे एक पत्र लिहिले आहे की, 'तुमच्या बोर्डिंगांत १ ल्यासारखे जेवण खाणे मिळत नसून त्यास अभ्यासास अडथळा होईल असे काम लावता. तो मुलगा हुशार व मेहनती आहे. त्यास तुम्ही काम लावू नये.' हे मला ओळकरच्या तोंडून कळल्याबरोबर मलाही पश्चात्ताप झाला. कारण न कळत हे काम करावयाचे होते. पण उघडकीस आले व स्कॉलरशिपही वाढली नाही. यामुळे नाईलाजास्तव पुन्हा ओळकरची विणवणी करावी लागली व बोर्डिंगात राहिलो.

अनुक्रमणिका

मग ओळकराना राग येऊन, ते म्हणू लागले की, तू आम्हास तुझी निम्मी स्कॉलरशिप बोर्डिंगाकडे दिली पाहिजे. नंतर मी विणविनी केली की, त्यातील मला काही एक देता येत नाही. त्यातून तुम्ही घेतले तर माझे शिक्षण एकदम बंद पडेल.

मे. टेंगसे डॉक्टरसाहेब यांनी माझ्यावर कृपा करून आपल्या मुलास मिळालेल्या स्कॉलरशिपेतील ३। -रु. दरमहा देण्याचे अभिवचन दिले आहे. त्यातील काहीतरी बोर्डिंगाकडे देईन असे म्हणताच गप्प बसले आहेत.

(ता. १२-६-१९१३)

आता बोर्डिंगात थोडेसे बरे वाटत आहे. ओळकर मास्तर हेही माझ्यावर मेहेरनजर केली आहे यामुळे आनंदून अभ्यासासही उत्तेजन मिळाले आहे.

(ता. २१-६-१३)

माहे जुलै १९१३ पासून श्रीमंत डफळे सरकार यांनी कृपा करून दरमहा १ रु. वाढविला याबद्दल त्याचे फार उपकार झाले. तसेंच माझा ३ इयत्तेच्या वार्षिक परिक्षेमध्ये १ ला नंबर आल्यावर मी एक टर्मच्या स्कॉलरशिपबद्दल, रावबहाद्दूर दिवाणसाहेब यांचेकडे अर्ज केला.

त्याअन्वये, रावसाहेब त्रिबकराव मराठे मामासो यानी दरमहा रुपये २ प्रमाणे व श्रीमान महाराज सरकार यानी दरमहा १। -रु. प्रमाणे एकूण ३। -रु. प्रमाणे एक वर्षभर माहे जून १९१३ पासून स्कॉलरशिप सुरु केली आहे. याजबद्दल त्याचेबद्दल उपकार झाले आहे. ईश्वर त्याना दीर्घीयू करो.

(ता. २०-७-१९१३)

ह्या टर्ममध्ये नाटके वगैरे बघण्याचा फार नाद लागला आहे. यामुळे पैशाची नासाडी होतेच परंतु अभ्यासास फारच अडथळा होऊन मन कावरे बावरे झाले आहे व कोणतेही काम नीट रीतीने होईनासे झाले आहे; याचे प्रायश्चित मिळत आहे.

ह्या महिन्याच्या आठवड्याच्या परीक्षेमध्ये संस्कृतमध्ये मार्क अगदी कमी मिळाल्यामुळे मन अगदी दुःखीत झाले आहे व आजपर्यंत ज्या रीतीने अभ्यास करून जय मिळत होता त्याचा नाश होऊन नावाला काळीमा लावीत आहे ही कल्पना मनात आली म्हणजे अंगावर शहारे येतात तेव्हा ईश्वराजवळ एवढीच प्रार्थना करतो की, ‘हे ईश्वरा असली वासना आजपासून मला देऊ नकोस व माझ्या अभ्यासाला माझे मन लागू दे.’

(ता. २९-७-१९१३ इ)

चि. रा. निंगप्पा हा मातोश्रीस फार त्रास देत असतो असे आईचे पत्र आले आहे व निंगप्पाचा फार राग आला आहे.

अनुक्रमणिका

(ता. १५-८-१९१३ इ)

पाऊस नाही व पिके नाहीत व लोक सगळे पोट भरण्यास दुसरीकडे जाणार आहेत त्यांच्याबरोबर चि. रा. निंगप्पा हाही जातो असे आज रोजी पत्र मला मिळाले.

हे ऐकून मनात फार वाईट वाटते. दुष्काळ असा शब्द ऐकल्याबरोबर अंगावर काटे येतात. करिता आईस व निंगप्पास इकडेच बोलावून घ्यावे असे मनात आणीले आहे.

(ता. २९-९-१९१३ इ)

आम्ही स्वयंपाकीस येथेच रोज जेऊ दिल्यामुळे आमचे सर्वांचे तीन दिवसाचे एक वेळचे जेवण बंद करण्यात आले आहे. शिवाय प्रत्येक वेळेस ३०½ इसमास ५० कोळंवी धान्ये (जोंधळा व तांदूळ) प्रमाणे ७ इसमास सकाळ व संध्याकाळी मिळून १६ कोळवी जोंधळा व ७ कोळवी तांदूळ एकूण २३ कोळवी धान्ये सकाळ संध्याकाळ मिळून देण्याचे-

वर दिलेल्या प्रमाणाने हिशेब करून पाहून बरोबर असल्याची खात्री करून घेऊन वरील प्रमाणे सामान देण्याचे या हुकुमाची अंमलबजावणी ता. ४-९-१३ पासून होणेची आहे.

(ता. ३-९-१९१३)
सही ए. बी. ओळकर

असा लखी हुकूम झाल्यामुळे उपासभार होत आहे व अभ्यासाची खोटी आहे. उरलेल्या भाकरी वगैरे स्वयंपाकणीनेच न्यावे असे होळकरनीच सांगितले होते. म्हणून उरलेले अन्न खात होती. एकाद्या दिवशी नसले म्हणजे ती घरी अगर हॉटेल मध्ये जेवीत होती. असे असताना त्याचे मन पुन्हा उलटल्यामुळे आम्हालाच ह्या शिक्षेला बळी पडावे लागत आहे. करिता कोठे बाहेर राहून अभ्यास करावा. असे मनात येत आहे. ईश्वर काय करील ते करो!!

(ता. ५-९-१९१३ इ.)

बोर्डिंगास त्रासून ओळकर मास्तर व सावंत मास्तर त्यांचे परवानगीनेच आज रोजी येथील थोरल्या महारवाड्यातील बाबू भिमा महार याचे घरी राहिलो. त्यानी मजवर कृपा करून आपल्या घरी मला जागा दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

(ता. ६-९-१९१३ कोल्हापूर)

महार वाड्यात राहील्यामुळे म्हणा किंवा आणखी काही कारणामुळे म्हणा माझा अभ्यास व्हावा तसा होऊन परिक्षेत ४ नंबरच्या आत नंबर आला नाही . व स्कॉलरशिप मिळाली नाही, याबद्दल मनास अतिशय वाईट वाटून पुन्हा बोर्डिंग हाऊसमध्ये १।— दंड देऊन आलो. बोर्डिंगात वाटेल तसले त्रास सोसून घेण्याचा निश्चयच केला आहे. हाल सोसल्या वाचून कोणत्याही मनुष्यास सुख मिळत नाही. व मोठेपणही प्राप्त होत नाही अशी पुष्कळ उदाहरणे दृष्टीस पडत आहेत. ता. २०-१०-१३ बोर्डिंगात दाखल झालो.

अनुक्रमणिका

सुट्टीनिमित्त जतेस ता. २६।१०।१३ रोजी निघून ता. २७।१०।१३ रोजी जतेस सुखरुप पोहोचलो. पिके नसल्यामुळे लोकांची पोटाची तारांबळ होत आहे. ह्यामुळे मनास फार वाईट वाटत आहे.

(ता. २८-१०-१३)

ह्याखेपेस हंगरेस सौ. शिरेव्वाबाईस भेटून आलो. माझा सासू सासरा व कुटुंबही आल्यामुळे त्यांच्याही भेटी झाल्या. ता. २०।११।१३ रोजी निघून ता. २१ रोजी कोल्हापूरी सुखरुप येऊन पोहोचलो. शाळेत जात आहे.

(ता. २२-११-१३)

येथे आल्यावर मामासाहेब मराठे हे उदराच्या विकाराने मरण पावले असे समजल्यावरून अतिशय दुःख होत होत आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो अशी प्रार्थना आहे. त्यानी आपल्या खासगीतून दरमहा २ रु. प्रमाणे १ वर्षभर स्कॉलरशिप देतो म्हणून वचन दिले होते. त्यापैकी ८ रु. मिळाले.

(ता. २२-११-१३)

**भाग १५ वा**

आमच्या या हास्टेलला पुरेसा फंड नसल्यामुळे बोर्डर्सची संख्या वाढणे शक्य नाही. ही उणीव आपण तरी खेडोखेडी भिक्षा मागून भरून काढावी अशा हेतुने नाताळाची सुट्टी साधून शनिवार ता. २०।१२।१३ रोजी सकाळच्या ८ च्या गाडीने बाहेर पडलो. माझ्या सोबतीस मि. गुंडे सिद्राम धुमाळे व रामचंद्र सखाराम कांबळे हेही आले होते. संध्याकाळी बुधगावी चांभार व महार मिळून अजमासे ५० मंडळी जमवून १ तासपर्यंत भाषण केले. ते माझे भाषण काही सद्‌गृहस्थास पटून आम्ही काहीतरी जमवून देऊ असे सांगितले. मि. कांबळे यांचे नातेवाईक असल्यामुळे आमच्या पोटाची सोय बरी झाली.

नंतर कापूस खेडास गेलो, तीकडील लोक अगदिच आडसंगे असल्यामुळे त्याने आमचे सांगणे सुद्धा ऐकून घेतले नाही म्हणून आम्ही वाळवे तालुक्याचे मामलेदार शेख सो यांना भेटून ही हकिगत कळविली. तेव्हा त्यानी आमची विणवनी मान्य करून ‘फेब्रुवारीमध्ये तुम्ही आल्यास मी फंड जमवून देईन’ असे सांगितले. नंतर इस्लामपूर, पेड, नेरल, इत्यादी ठिकाणचे लोकही अगदी तसेच होते. मि. धुमाळे यांच्या माता-पित्याने आमच्या पोटाची व्यवस्था छान ठेवली होती. त्यानी आमच्यासाठी एकदा कोंबडा कापून जेवण घातले. तसेच एकदा पोळीचे जेवण दिले. आणि धुमाळ याच्या चुलत्यानी (दादूनीही) एकदा आम्हास पोळी केली होती. हे इथे सांगितल्या वाचून मला रहावत नाही. पुन्हा बुधगावास येऊन मदत मागितली परंतु ते लोक आपापसात एकमेकावर ढकलू लागले. नंतर मी येडबाळास मातोश्रीस व निंगापास भेटण्यास गेलो तेथे हे सुगीस आले होते.

शाळा पाहून मला मोठा आनंद झाला. व काही मुलांचे कानडी वाचन घेतले. मुले फारच हुशार दिसली. मि. गुराप्पा व रामप्पा पट्टण अथणीकर हे मास्तर आहेत त्यांचीही ओळख करून घेऊन एथे

अनुक्रमणिका

शुक्रवार ता. २-१-१९१४ रोजी सुखरुप पोहोचलो. ताजा कलम : इचलकरंजी, कुरुंदवाड, आळेत वगैरे ठिकाणी जाण्याची इच्छा होती. परंतु पायास बूट लागून चालता येत नव्हते म्हणून जाणे झाले नाही.

(ता. ७-१-१९१४)

मी दिवसे दिवस Dull डल्ल होत चाललो असे मास्तर लोकही म्हणतात. मलाही तसेच वाटू लागले आहे असे का होते ते काही समजत नाही. ईश्वर माझ्या बुद्धीस चांगले वळण देवो अशी त्याची प्रार्थना करतो. वाईट गोष्टी करणे किंवा बोलणे हे बन्द ठेवण्याविषयी शपथ घेतली . निदान आज पासून २ वर्षे तरी ही शपथ पाळली पाहिजे.

(ता. ९-१-१९१४)

मन उदास झाल्यामुळे कोठेरी जाऊन यावे अशी इच्छा झाल्यामुळे मंगसुळीस जाऊन आलो. मागे उदासचे पत्र घराकडे लिहिल्यामुळे चि. निंगप्पा व मातोश्रीही घाबरून मंगसुळीस आले होते. त्यांची सजजूत घालून व चिंचलीच्या जत्रेस जाऊन आलो. गेल्याची तारीख ता. ११-२-१९१४ व आल्याची तारीख १५-२-१९१४. ता. ४।४।१९१४ शनिवार रोजी कोल्हापूरहून निघून त्याच दिवशी मंगसुळीस १२-०० वाजता येऊन पोहोचलो. ५।६।७ तारखेस मंगसुळीस मुक्काम करुन ता. ८ रोजी निधून ९।४।१४ रोजी जतेस ११-०० वा. सुखरुप पोहोचलो.

(१०-४-१९१४)

शनिवार ता. ११-४-१४ रोजी श्रीमंत रावराव डफळे सरकार यांची भेट घेतली. स्कॉलरशिप वाढविण्यासाठी कारभारी साहेब व चीफ साहेब यांचेकडे विनंती केली. पण काही झाले नाही.

(ता. १-६-१९१४)

आदितवार ता. १४-६-१९१४ रोजी निघून हिंगण गाव एथे १।२ मुक्काम करून मंगळवारी कोल्हापूर इथे सुखरुप येऊन पोहोचलो. येथे आल्यापासून आनंद होत आहे. पण अभ्यास पुढे गेल्यामुळे वाईट वाटते.

(ता. १७-६-१९१४)

ति. रा. रामचंद्र नारायण सावंत यांनी काही बोलल्याबद्दल मन उदास झाले. गोविंद ऐंदाळे याचे माझे पटून येत नसल्यामुळे त्याचीच सावंत मास्तर तडफदारी करतात अशी मनाची खात्री करून बोर्डिंग कायमचे सोडून आलो.

(ता. ९-९-१४ मु. जत.)

श्रीमंत चीफ साहेबानी तोंडी सांगितल्याप्रमाणे स्कॉलरशिप वाढविण्यासाठी अर्ज त्यांचेकडे दिला आहे. पुन्हा सोमवारी भेटण्यास सांगितले आहे.

अनुक्रमणिका

(शनिवार ता. ११-९-१४ मु. जत.)

पहाटे एक रुपाया सापडलेला होता. तो यल्लप्पा दादाजवळ देऊन आलो. स्कॉलरशिप वाढविता येत नाही असा श्रीमंताचा तोंडी हुकूम झाला.

(ता १३-९-१४)

नंतर ता. १६।९।१४ रोजी विजापूरास जाण्यास निघालो ता. २० रोजी विजापूरास पोहोचलो. यल्लप्पा दादाची लागलीच गाठ पडली. इंग्रजी शाळेच्या हे. मा. स जाऊन भेटलो. त्यानी लिव्हिंग सर्टि. आल्यावाचून शाळेत बसू देता येत नाही म्हणून सांगितले. नंतर ५।१०।१४ रोजी निघून जतेस आलो. आई व निंगप्पा सुगीस परगावी गेले आहेत. म्हणून पाच्छापुरास राहिलो. यल्लप्पा दादानी माझ्या पोटास फुकट १५ दिवस घातले. त्याबद्दल त्याचा मी फार आभारी आहे.

(ता. १२-१०-१४)

मे. गोखले सब जज्ज संस्थान जत यांचे वशिल्याने पुणे एथे बोर्डिंगात आलो आहे. सोमवार ता. ७।१२।१४ माझी जत संस्थानाकडून मिळणारी स्कॉलरशिप जानेवारी १९१५ पासून श्रीमंत डफळे सरकार यांचे हुकमावरून बंद पडली. यामुळे वाईट वाटते. असो. आजपर्यंत दिल्याबद्दल मी श्रीमंतांचा अत्यंत आभारी आहे.

(ता. १५-१२-१४)

मी न्यू इंग्लीश स्कूलच्या वार्षिक परीक्षेस बसलो. कोल्हापूर सोडल्यापासून पुस्तकाकडे न पाहिल्यामुळे मराठीखेरीज करून सर्व विषयात नापास झालो.

(ता २३-१२-१४)

**भाग १६ वा**

मी येतेवेळी लिव्हिंग सर्टि. साठी कोल्हापूराहूनच आलो. सर्टि. मिळाले. त्यात खोडाखोडी झाल्यामुळे व जन्म तारीख नसल्यामुळे कबुली केली नाही. म्हणून परत पाठवून दुसरी प्रत मागविली. त्यातही जन्म तारीख नसल्यामुळे शाळेत नाव काही पडेना. यामुळे मन अगदी उदास झाले. शेवटी ति. रा. पटवर्धन मास्तर हे स्वतः शाळेत येऊन नाव घालण्याविषयी खटपट केली.

आर.एच्. केळकर मास्तर न्यू इंग्लीश स्कूल पुणे यानी कृपाळू होऊन पीयरपाइंटची जॉमेट्री किंमत १२ व ऍटहोम अँड ॲब्रॉड किं. ८६ एकूण १८२ रु दिले. त्याबद्दल त्याचा मी फार आभारी आहे.

(ता. ४-२-१६)

आठवड्याच्या परिक्षेमध्ये इंग्रजीमध्ये हायस्ट मार्कस् मिळाले.

अनुक्रमणिका

(ता. १२-२-१६)

दोन दिवस झाले, ताप येऊन डोके दुखते. यामुळे वाईट वाटते व घराकडील आठवण होते. तापामुळे तोंड बेचव झाले आहे. चव येण्यासाठी नेहमीप्रमाणे अथवा संवयीप्रमाणे मटण अथवा मासे खायला हवेत, पण नियममहाराजांची. मनाई असल्यामुळे नाईलाज झाला आहे. जवळ पैंसेही नाहीत.

(ता. १६-२-१६)

आजारामुळे व काही कारणामुळे मन बेचैन झाले आहे. कधी सुटी मिळते व घरी कधी जाईन असे झाले आहे. ईश्वर करो व तो दिवस प्राप्त होवो.

(ता. १६-२-१६)

आज रोजी नाव पडले.

ति. रा. पटवर्धन मास्तर यांचा मी फार आभारी आहे. पुन्हा ५ वी इयत्तेत बसलो.

(२८-१-१५)

सिस्टर जनाबाई सुपरि. ह्या पोटाची काळची चांगली घेतात. स्वयंपाकीन नसल्यामुळे त्रास फार झाला. स्वयंपाकीण मिळाली.

(ता. १८-१-१५)

कोल्हापूरच्या बोर्डिगातील काही मित्रांची आठवण झाली म्हणजे मनास उदास वाटते. त्याची वागणूक व मनमिळावूपणा हे गुणांची आठवण होते.

(ता. ४-१-१९१५)

घराकडील, आई, भाऊ, बहिणीची आठवण होऊन आज उदास वाटते.

(ता. १५-१-१५)

दररोज सकाळी उठल्यावर अंगण झाडावे लागते. त्याचा फार कंटाळा आला आहे व कधी कधी तास दोन दोन तास सुद्धा झाडण्यामध्ये जातात.

(ता. २०-२-१५)

अनुक्रमणिका

सुपरि. जनाबाई शिंदे ह्या थोड्याशा तिरसठ असल्यामुळे त्या काही तोंडातून शब्द सुद्धा काढण्याची सोय नाही. लागलेच माझा अपमान झाला म्हणून बसतात. एकदा स्टेशनरीसाठी २ आणेचे पैसे दिले होते. त्याचा संध्याकाळी हिशेब देताना मला एका बोर्डरचे (ज्ञानदेव द्रुनाक घोलप) याचे उदाहरण देऊन म्हणाले ‘असेच ज्ञानूला स्टेशनरीसाठी पैसे दिले म्हणजे तो पैसे चोरून ठेवीत असे. व घराकडे पत्रे वगैरे लिहीत असे.’ यावर मी उत्तर दिले, ‘आपणास जर माझा संशय येत असल्यास आपणच स्टेशनरी आणून देत जा.’ असे म्हणताच खूप रागावल्या व अपमान केला म्हणून सेक्रेटरी पटवर्धन याना सांगितले. त्यानी माफी मागणेस सांगितले व मी मागितली. खरोखर या अपमानाची शिकस्त झाली.

(ता. २०-२-१५)

काल रोजी नाना वाड्यात ना. गोखले यांचेबद्दल दुःख प्रदर्शित करण्याकरिता एक जंगी सभा भरली होती. तीत मोठमोठे गृहस्थ हजर होते. मुंबई इलाख्याचे गव्हर्नरसाहेबही आले होते. तेव्हा अशा गृहस्थाच्या व्याख्याने ऐकण्यास मिळाली याबद्दल मोठा आनंद झाला व स्वतःस धन्य समजलो. या पुण्या शहरांमध्ये राहिल्याने किती फायदा आहे! बॅरिस्टर गांधीसही पाहिले.

(ता. ४-३-१९१५)

आज सकाळी ड्रीलला जाताना वाटेत एक पैसा सांपडला. तो पोलिस चौकीवर गुदरला.

(ता. ६-३-१९१५)

उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त ता. १८।४।१५ रोजी निघून ता. २३ रोजी शुक्रवारी येऊन सुखरुप पोहोचलो. येताना पंढरपुराहून आलो.

(ता. २४-४-१५)

सिरनांदगीहून येताना साप भेटला होता व मी भ्यालो. कारण असा प्रसंग कधीच आला नव्हता.

(ता. ९-४-१९१५)

चि. रा. निंगप्पा याचे लग्न यंदा केले. आजमासे ८० रुपये खर्च आला. लग्न चांगले म्हणण्यासारखे झाले. ह्याबद्दल कौतुक वाटते. वैशाख शु॥११ म्हणजे ता. २५।५।१५ रोजी हळदी होऊन दुसरीच्या दिवशीच द्वादशीची लग्ने लागली.

(जत ता. ३०-५-१५)

रविवार ता. १३।६।१५ रोजी जतेंहून निघून ता. १४।६।१५ रोजी संध्याकाळी कोल्हापूरास पोहोचलो.

(ता. १५-६-१५)

गुरुवार ता. १।७।१५ रोजी राजाराम हायस्कूल मध्ये नाव घातले.

अनुक्रमणिका

(ता. २-७-१५)

आजपर्यंत जन्म तारीख अद्याप कोठेच दाखल केले नसल्यामुळे आजमासाने १५ जुलै १८९८ ही ठरवून राजाराम हायस्कूलमध्ये आज रोजी दाखल केली.

(ता. ३-९-१५)

आज्ञाधारकपणा हा गुण खरोखरच अत्यंत मौल्यवान आहे. हा गुण अंगी असला म्हणजे जीवित संपादन होते म्हणटले तरी चालेल.

टर्मनिल परीक्षा संपल्याबरोबर ता. १२।१०।१५ रोजी निघून नागपूरची वस्ती करून गुरुवारी जतेस पोहोचलो.

(ता. १४-१०-१५)

२४।११।१५ रोजी निघून हिंगण गावात गुरुवार/शुक्रवार राहून शनिवारी संध्याकाळी एथे सुखरुप येऊन पोहोचलो.

(ता. २७-११-१५)

मी पुण्याचे बोर्डींग हाऊस सोडून पुन्हा कोल्हापुरी आल्यामुळे डिस्प्रेस्ड क्लासमिशन (हिंदुस्तान) चे जनरल सेक्रेटरी गुरुवर्य रा. रा. विठ्ठल रामजी शिंदे यानी पुन्हा तिकडेच पाठविण्याबद्दल व इकडे घेता येत नसल्यास आपल्या बोर्डीगमध्ये घेऊ नये. असे रावसो माधवराव याना लिहिले होते. त्याचे प्रकरण चालवून शेवटी मला बोर्डिंगमध्ये घेऊच नये कळविले. तेव्हा मी हताश होऊन अती दुःखाने जणु काय आपल्यावरती डोंगरच कोसळल्यासारखे होऊन गुरुवार ता. २।१२।१५ रोजी बोर्डिंगच्या बाहेर पडलो. रा. रा. चंद्र बाणदार महार यांनी कृपाळू होऊन आपल्या घरी जागा दिली. व काहीतरी सोय लागे पर्यंत जेवण वाढण्याचेही मनावर घेतले. याबद्दल त्यांचे उपकार मानावे तितके थोडेच आहे. तसेच क्लासफेलो रा. रा. कृष्णाजी गायकवाड यांनी माझ्या बद्दलचा त्रास घेऊन सबंध एक दिवस सारखे हिंडून दरमहा २/-रु. मिळकत काढल्याबद्दल त्याचेही मजवर अत्यंत उपकार झाले. त्याच प्रमाणे ति.रा. ओळकर मास्तर व सावंत मास्तर व श्रीधरराव चव्हाण हे प्रत्येकी एकवार देण्याचे कबूल केले. या बद्दल त्यांचा मी आभारी आहे. अशीच काही संकटे सहन करूनही अभ्यास कोल्हापुरातच करण्याचा निश्चय केला आहे. पण पुण्याच्या बोर्डिंगात जायचे नाही असे ठरवून ठेवले आहे.

(ता. ५-१२-१५)

जरुरीने येण्याबद्दल पत्रे, आल्यामुळे आदितवार रोजी निघून हिंगण गावाची वस्ती करून काळ सोमवारी संध्याकाळी (ता. २०।१२।१५) सुखरुप येऊन पोहोचलो. एथे प्लेग असल्यामुळे गाव बाहेर पडले आहे. दररोज एक-दोन केसेस होतात.

अनुक्रमणिका

(२१-१२-१५)

प्लेग वाढत्या प्रमाणावर असल्यामुळे भावास व आईस बस्तवड्यात ठेऊन आपण कोल्हापूरास जावे असा बेत करून शनिवार ता २५।१२।१५ रोजी निघून दुसऱ्या दिवशी बस्तवाड्यात आलो. पहातो तो तोही गाव फुटला आहे. तुरळक केसेस होतात असे ऐकल्यामुळे वाईट वाटले. सर्वांच्या भेटी झाल्या. आकू मावशीस पाहून फार दिवस झाल्या कारणाने म्हातारपणी भेट झाली ही गोष्ट चांगली झाली. शेवटी आईच्या इच्छेने आई व निंगप्पा बस्तवड्यात राहिले. मी मावशींच्या आग्रहामुळे जीवना बापूस पहाण्यास जाण्याची सम्मती दिली. एक रुपया निंगपा जवळून व बहिण काशिबाई हीज कडून घेऊन गाडी खर्च घेतला.

मंगळवारी ता. २८।१२।१५ रोजी सकाळी न्याहारी करून तासगाव स्टेशनवर तीनच्या गाडीने निघाले. स्टेशनपर्यंत चि. निंगप्पा आला होता. धारवाडास मेल चॉर्ज २।१।९ पडतात. माझे जवळ फक्त २ रु. १ आणाच होता तेव्हा अडचणच झाली. शेवटी बेळगावचे तूर्त तिकीट काढून घेतले. गाडीत बसल्यावर एका मारवाडी मुलाजवळ ९ पैसे मागितले त्यानी मेहेरबानकी करून दिले. तेव्हा बेळगावास दुसरे तिकीट काढून तीच गाडी पकडली व रात्री २ वाजता धारवाडास उतरलो. उजडे पर्यंत स्टेशनवरच झोपी गेलो.

विचारीत हेडक्वार्टरास सकाळी ८ वाजता पोहोचलो. भेट होऊन बरेच दिवस झाल्यामुळे एकमेकास गाव नाव सांगितल्या वाचून ओळखले नाही.

(ता. २९-१२-१५)

चार दिवस राहून बुधवार ता. ५।१।१९१६ रोजी रात्री १२ च्या गाडीने कोल्हापुरास निघालो. गाडीखर्च २रु. व येताना सौं. काशिबाईचा एक रुपाया व चि. निंगप्पा एक असे २ रु. एकूण ४।— रु. ति. रा. जीवना बापूने दिले. २ रु. येथून पाठवून देणार होतो. परंतु येथे एकाचे देणे असल्यामुळे त्याला देणे भाग पडले. गुरुवारी संध्याकाळी रा. रा. चंद्रा बाणदार यांचेच घरी आलो.

(ता. ६-१-१९१६)

मे. गोविंदराव सोहनी वकील यांनी एक रुपया व कृष्णराव सावंत याने चार आणे दिले. सावंत वकिलाने दर—महा चार आणे देण्याचे वचन दिले आहे. याबद्दल या उभयतांचा फार आभारी आहे.

(ता. १०-१-१६)

ति. रा. चंद्रा बाणदार व त्यांचे पत्नी सौ. तानुबाई हे नवरा बायको माझ्यावर आपल्या घरातल्या माणसाप्रमाणे प्रिती करतात. याबद्दल त्याचा मी अत्यंत उपकारी आहे. परमेश्वराजवळ प्रार्थना करतो की, देव त्यांना व त्याच्या मुलां-लेकराना खुशाल ठेवो व त्यांचे कल्याण करो.

(ता. २०-२-१९१६)

अनुक्रमणिका

ति. रा. चंद्रा बाणदार याच्या घरातून बाहेर आलो. आता मात्र अगदी तारांबळ उडाली आहे. त्याचे एथे पुढे चालेना म्हणून बाहेर यावे लागले.

(ता. ६-३-१९१६)

मे. सोहनी वकील यानी पुन्हा एक रुपया दिला.

(ता. ८-३-१९१६)

क्लास फेलो फणसाळकर यानी एक रुपया दिला याबद्दल त्यांचा आभारी आहे. रावसाहेब गोखले दरमहा चार आणे देतात या बद्दल त्याचा आभारी आहे.

रा. रा तुकाराम गणेशचार्य कोगील यानी इंग्लिश चेंबर्सची डिक्सनरी सेकंडहँड किं. १४ आणे ही विकत घेऊन दिली.

आणि एक बाराचे पैसे तीन आणे आले व दुसऱ्याकडून त्यास मिळत असलेले. ॥. आणे. एकूण १ रु. ४ आणे दरमहा देतात. याबद्दल त्यांचे जितके मानावे तितके उपकार थोडेच आहे.

(ता. १६-१-१९१६)

एक विद्यार्थी (पिसाळ यांनी) एक रुपया दिला. त्याबद्दल त्याचा मी आभारी आहे.

(ता. १९-१-१६)

मंगळवार ता. १४-११-१९१६ रोजी मला बोर्डिंगात घेण्यात आले. संध्याकाळपासून जेवण सुरू झाले. त्याबद्दल मी मे. ओळकर व सावंत याचा मी अत्यंत आभारी आहे. माझ्या गैरवर्तणुकीबद्दल मला क्षमा करून व मे. विठ्ठल रामजी शिंदेच्या म्हणण्याला न जुमानून केवळ माझे कल्याणार्थ या उभयतांनी व तसेच या संस्थेतील प्रमुख मंडळीने आपला उदारपणा दाखविल्याबद्दल या संस्थेचा मी फारच ऋणबद्द आहे. ते मी आजन्मात विसरणार नाही.

(ता. १५-११-१९१६)

रा. रा. कृष्णाजी बाबाजी दावणे यांची एक स्कॉलरशीप दरमहा तीन रुपयाची असलेली मला जानेवारी सन १९१६ पासून दोन वर्षे मुदतीची मिळाली.

(ता. २२-९-१९१६)

सहाव्या इयत्तची सहामाही परीक्षा पास झाली. दिवाळीच्या सुट्टीनिमित्त जतेस ता. २१-१०-१६ रोजी निघून ता. २४-१०-१६ रोजी पोहोचलो. यंदाच्या साली या दिवसात पाऊस अतोनात झाला.

अनुक्रमणिका

दिवाळीनंतर असा पाऊस कोणत्याच वर्षी झाला नव्हता, असे वडिल माणसे बोलतात. रविवार ता. १२।११।१९१६ रोजी निघून सोमवारी २-० वाजता एथे सुखरुपपणे पोहोचलो.

(१५-११-१६ कोल्हापूर)

चि. सौ. शिरोळाबाई (बहीण) ही बाळंत रोगाने मंगळवार तारीख १५-३-१९१६ रोजी देवाज्ञा झाली. अगदी दुःख झाले. ईश्वर मर्जी. बहीण फारच गुणवान पतिव्रता होती म्हणून वाईट वाटते. तिच्या आत्म्यास शांती मिळो.

(ता. २२-३-१९१६)

मे महिन्याच्या सुट्टीत मातोश्रीसह श्री क्षेत्र पंढरपूरची यात्रा केली. ता. २०-६-१९१६ रोजी जतेहून कोल्हापुरास पोहोचलो. मे. भार्गवराव कुळकर्णी मास्तर महिन्यास तूर्त एक रुपाया देतात. मे. बापूसाहेब गायकवाड कृपाळू होऊन रोज वार देतात. क्लास फेलो केदारी चव्हाण वार देतात. त्या सर्वाचा मी आभारी आहे.

(ता. ७-१९१६)

मे डाह्याभाई पटेल इंजिनिअर हे दरमहा एक रुपाया देतात याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

(ता. १५-७-१९१६)

श्रीमंत युवराज राजाराम महाराज यांच्या वाढदिवसा निमित्त सोमवार ता. ३१-७-१९१६ रोजी मराठा बोर्डिंगात विद्यार्थी मंडळीची सभा भरली होती. चौगुले रावसाहेब हे अध्यक्ष होते. बाकीच्या विद्यार्थ्या प्रमाणे मी ही चार शब्द बोलावे अशी मे. सावंत मास्तर यांनी सूचना दिली. त्या प्रमाणे बोलण्यास उठून गेलो. अशा ठिकाणी बोलण्याचा पहिलाच प्रसंग असल्यामुळे व भितीमुळे अशुद्ध वाक्ये व शब्द यांचे रेलचेल होईल व मंडळीमध्ये हंशा पिकेल अशी भिती वाटत होती. परंतु ईश्वर कृपेने तसे झाले नाही. तेवढेच नव्हे तर भाषणही चांगले व्यवस्थित झाले असे मागाहून सावंत मास्तराने सांगितले. व तसेच

अध्यक्षाना माझ्या तोंडातून अस्पृश्य शब्द निघण्यापूर्वी मी महार आहे असे त्यांना वाटले नाही. व भाषण चांगले केले. असे त्यांचे तोंडून उद्गार निघाले म्हणून सावंत मास्तराने कळविले. त्याबद्दल परमेश्वराचा अत्यंत आभारी आहे व अशीच मला बूद्धी व यश देवो. अशी त्याची सविनय प्रार्थना करतो.

(ता. १-८-१९१६)

तरुणपणी विषय इंद्रियाचा दुःसत्ह भास होतो. स्त्रियाकडे टक लावून पहाण्याची व मनात नाना प्रकारची विचार आणण्याची नेहमी प्रवृती होते. व त्यामुळे दिवसा व रात्री सुद्धा मनाची चलबिचल होऊन इंद्रियास त्याच्या चेतणे प्रमाणे वागण्याची फुरसत सांपडल्याबरोबर आपला पगडा बसविल्यावाचून रहात नाही. व स्वप्नावस्थाही झाल्यावाचून रहात नाही. तेनेकरून अशक्तपणा भासून शरीर निस्तेज होते.

अनुक्रमणिका

एकंदरीत पाहिले असता हे तरुणपण हे भालेच्या तीक्ष्ण टोकावरच असल्यासारखे मला वाटते. कोणत्या वेळी भालेचे टोक शरीरास खूपसून शरीर अगदी खराब करेल याचा नियम नाही. खरोखर पाहिले गेले असता विषय नादापासून या जगी काडीचा सुद्धा फायदा नाही. केवळ प्रजोउत्पती होण्यासाठीच परमेश्वराने ही इंद्रिये उत्पन्न केले आहे. हा सृष्टी नियमाचा विध्वंश करून मनास वाटेल तसे वागू दिल्यास त्याचा परिणाम हानीकारकच केव्हा ही होणार ही निर्विवाद गोष्ट आहे. या गोष्टीपासून किर्ती होत नाही अगर पैसा मुबलक मिळत नाही. ही गोष्ट ध्यानात ठेवून तिच्या पासून अलग रहाणेचा निश्चय केला आहे. तो ईश्वर पार पाडो.

(ता. ८-१९१६)

शिकवण्याची कला साधावी म्हणून मे. सावंत मास्तराच्या मुलींना व हॉस्टेलमधील ४ थीच्या क्लासास नाताळ सुट्टींत दररोज एक एक तास शिकवीत आहे.

(ता. २७-१२-१९१६)

मे. नवरेशास्त्री बुवा हे दररोज मेहेरबानीने संस्कृत शिकवित असतात. त्याबद्दल मी त्याचा आभारी आहे.

(ता. २७-१२-१९१६)

मंगळवार ता. ६-२-१७ रोजी जतेतील आप्त मंडळी भेटून बुधवार ता. ७।२।१९१७ रोजी चिंचणीच्या यात्रेस्तव येणाऱ्या पाच्छापूरातील माणसाबरोबर चिंचणीपर्यंत आली. शनिवारी चिंचणीला पोहोचून आदितवारी जत्रेत मुक्काम करून सोमवारी सकाळी गाडीने निघून येथे दुपारी २-० वाजता सुखरुप पोहोचलो.

चिरंजीव निंगाप्पा बंधू हा सोमवार ता. १६-१-१७ इ. सन पहाटे तीन वाजता मरण पावल्याचे पत्र पोहचताच अतिशय दुःख झाले आहे. प्रिय बंधू सोडून गेला. लागलीच पत्र पोहोचताच गुरुवारी दुपारी दोनच्या गाडीने गावी निघालो. आज शुक्रवार आहे, अन्न नसल्यामुळे वाट चालण्याला शक्ति नाही. पुढे पाऊल सुद्धा टाकवेना. रात्री मल्लवाडीस वस्ती केली. स्वप्नही वाईट पडले आहे, म्हणून जीव अगदी थाऱ्यावर नाही. परमेश्वर काय करणार ते करो. त्याला मी पाठच दिली आहे. (बेळुंकीच्या शिवारात मधील ओढाच्या जागी वडाच्या झाडाखाली.)

(ता. १९-१२-१९१७)

शुक्रवारी जिरगाळ येथे वस्ती करून सकाळी घरी पोहोचलो. आईचे अति दुःख बघून पोटात कालवाकालवी होऊ लागली. मला जग भयाण व निसार दिसू लागले. करमेनासे झाले आहे. भावाच्या आत्म्यास शांती मिळो.

(ता. २१-१-१९१७)

मातोश्रीस पाच्छापुराला ठेवून आलो आहे, मेव्हना गुरापाही आला होता.

(१२-२-१९१७ कोल्हापूर)

सध्याची युद्धाची संधी आम्हा अस्पृश्य लोकांना चांगली आहे असे मला वाटते. हिंदुस्तानातील बहुतेक सेना रणभूमीवर गेल्यामुळे नवीन रिक्रुटिंग भरती होऊ लागली आहे. जवळ जवळ जबरीने होत आहे तेव्हा ही संधी साधून आम्हा अस्पृश्य लोकापैकी काहीजण गेले तर फारच चांगले होईल. कृपाळू होऊन इंग्रज सरकारनी आम्हा लोकासही भरतीत घेण्याचा कायदा काढावा असे मला वाटते.

(कोल्हापूर ता. १६-२-१७)

महार लोकांची फलटण ठेवण्यास सरकारनी परवानगी दिली असे समजल्याबरोबर माझा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. आपण फलटणीत जावे असे मला वाटू लागले आहे. संधी मोठी चांगली आली आहे. अशी संधी पुन्हा मिळावयाची नाही, तेव्हा रणभूमीवर जाऊन आपण देह ठेवावा किंवा हाती धरलेले काम तडीस न्यावे याबद्दलचे विचार तरंग सारखे मनात घोळत आहेत. परमेश्वरा ज्यात माझे व जातीचे कल्याण असेल ते मला करण्यास लाव हीच तुला प्रार्थना आहे.

(ता. २३-२-१९१७ कोल्हापूर)

श्रीमंत कॅप्टन बाळासाहेब डफळे यांची भेट घेतली. हे सध्या रिक्रुटींग ऑफिसर आहेत. त्यांचेकडून माझ्या कार्यास काही मदत मिळावी अशी इच्छा प्रदर्शित केली पण तुम्ही फलटणीत यावे हे मला बरे दिसते यात तुमचा फायदा आहे. शिकून काही उपयोग व्हायचा नाही. तिकडे तुमची बढती होत होत मोठे तुम्ही व्हाल. असा उपदेश केला. विचारांती व काही विद्वान लोकांनी नको म्हणून सांगितल्याने डफळे यांना माझी खुषी नाही असे सांगितले. फलटणीत जाण्यापेक्षा शिक्षणात जास्त फायदा आहे असे विद्वान लोकांचे मत पडले.

(ता. १७-३-१९१७)

निंगप्पाची वरचेवर आठवण होते व आठवण झाली की, उरात धस्स करते. व डोळे भरून येतात, पोटात कालवाकालव होते. बांधवाच्या मरणाने खरोखर अती दुःख झाले आहे असे यापूर्वी कोणाच्याही मरणाने झाले नव्हते . असो देवा तू ठेवील असे राहिले पाहिजे.

(ता. १७-३-१७)

निंगपाची पुन्हा पुन्हा आठवण होते. व आठवण झाल्या बरोबर पोटात धस्स होते. अंगाला जणू काय काटे बोचल्यासारखे होते. अंतःकरण उदिर्ण होते. घरातील वाघ नाहीसा झाला असे वाटते. आता त्या घरी मी राहू कसा असे होऊन गेले आहे. आठवण झाली की काळजाचे पाणी होते व काय करु असे होऊन जाते. त्या ४-५ वर्षात कुटुंबातील ५ माणसांना त्या निघृण काळाने अगदी ओढून नेले. त्यांच्यावर घारीसारखी झडप घातली. अशी एकावर एक दुःखे येऊन पडली. घर अगदी नेहमी खुलून असावयाचे. अन्न

अनुक्रमणिका

मिळविणारा अगदी नाकी नऊ यायचे दुष्काळात (सुकाळात सुद्धा) पोटभर अन्न आम्हास मिळत नसे. इतके कुटुंबातील माणसे आम्हा मुलाना जगविण्यासाठी आमच्या आई बाबानी किती त्रास घेतले त्यांची फळे त्याना मिळाली नाहीत. उलट आईस मात्र दुःखेच प्राप्त झाली. त्या पेक्षा परमेश्वरा आम्हा सर्वांचा संयोग न करता तर या वियोगाचा आम्हास त्रास झाला नसता. व माझ्या आई बापास जगविण्याचे नसती खटपटही पडली नसती. श्रीमंताची मुले मेली तर काही घोर नसतो. कारण त्यांचे पालन पोषण सहज होत असते पण गरीबाला आपली मुले जगविण्यासाठी चिमणी सारखे तोंडात चारा आणून त्यांचे पोषण करावे लागते.

माझ्या लहानग्या भावा बहीणीस जगविण्यासाठी दुष्काळात मला व माझी थोरली बहीण साहूबाई हिस गावात जाऊन भिक्षा मागावी लागली आहे. रानामाळांतून कामे करावी लागली आहेत. या सर्वाचे आठवण झाली म्हणजे खरोखर असे वाटते की, आपणही कोठेतरी विहीरीत पडून अगर काहीतरी विष खाऊन आत्महत्त्या करावी.

एकाद्या गुलाबाचे अगर मोगऱ्याच्या झाडाला रात्रभर आलेली फुले फुलविण्यासाठी किती त्रास सोसावा लागत असेल किती वेणा द्यावे लागत असेल. पण अगदी थोड्या वेळात म्हणजे सकाळी दोन तासात कोणीतरी याव‌याचे व दयामाया न करता तोडून न्यायची अशी स्थिति आमच्या कुटूंबाची झाली आहे. माझ्या भावा बहिनीच्या मागे आपण इहलोकी देह ठेवून त्याना जाऊन मिळावे असे वाटते. देवा असा प्रसंग देऊ नयेस.

(ता. २३-३-१९१७ कोल्हापूर)

परमेश्वराने मला काही तरी तेव्हा त्यांचे आभारी मानून त्यांची इच्छा उद्योग करीत राहीले पाहिजे व शिक्षण संपले म्हणजे काय करावयाचे हे फक्त आपल्या जात बांधवांच्या उन्नतीसाठी करावयाचे कसल्याही लोभाला बळी पडावयाचे नाही. म्हणून हे जगत् चालका हे देवादि देवा मी तुझी प्रार्थना करतो की, माझ्या उद्योगात मला यश दे! व माझा हेतू तडीस नेण्यास मदत कर ऐवढेच तुझ जवळ पदर पसरून हात जोडून मागत आहे. हे माझे मागणे मान्य कर आणि याचा उद्धार व माझ्या लोकांचाही उद्धार कर!

(ता. २-१०-१९१७ कोल्हापूर)

इयत्तेच्या टरमीनल परीक्षेमध्ये व मराठी खेरीज करून बाकीच्या गणित, संस्कृत व सायन्स या विषयात नापास झालो आहे, मी दूर्लक्ष केल्यामुळे आणि जेणे करून अभ्यास न झाल्यामुळेही ही पाळी आली. 'उद्योगा वाचून फळ कसे मिळावे'

(ता. २६-११-१७)

हे मन अगदी चोरटे व अतिशय नीच असल्यामुळे त्याचा पगडा बसून मनात हलकट विचार येतात. आणि शरीरासही आळसी करून टाकते. मन असल्या प्रकारचे असल्यावर जन्माची सफलता तरी कशी होणार! म्हणून परमेश्वराला स्मरुन आणि सत्पुरुषास ध्यानी आणून आध्यात्मिक व आधिभौतिक ज्ञान संपादण्यासाठी आणि त्याचे सर्व श्रेय त्या दयाधन प्रभूला देणेसाठी आतापासून खालील दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आहे.

अनुक्रमणिका

ता. २९।७।१८ ते ६।८।१९१८ पर्यंत मास्तराचे काम केले. परंतु शाळेच्या त्रासामुळे आणि जेवणाच्या गैरसोयीमुळे तसेच महारवाडा हिडीस व बेसुमार असल्यामुळे उभ्याने राजीनामा देऊन येथे ता. ८।८।१८ रोजी सुखरुप पोहोचलो.

(ता. २०।८।१८)

निंगप्पा ऐंदाळे याचा व माझा बेबनाव झाल्यामुळे तेरदाळ सोडले.

मी आदितवार ता. ८।९।१८ निघून पाच्छापूर व पांडेझरी येथे मुक्काम करून मंगळवार ता. १०।९।१८ रोजी विजापुरास पोहोचलो. बरोबर धुळाप्पा गुरलिंगप्पा होता.

(ता. १३-९-१९१८)

अँड नाईक यास देवाज्ञा झाल्यामुळे दुःख प्रदर्शित करण्याकरिता विजापूर येथील मागासलेल्या लोकांची सभा भरली होती. त्यात मीही आमच्या समाजा तर्फे दुःख प्रदर्शन केले.

विजापूर येथील लिंगायत मंडळी फार सुधारलेली आहेत. मि. इंडीमास्तर यांनी हायस्कूल मधील मास्तरांकडून वर्गणी जमवून मला कपड्यासाठी म्हणून ५।—रु. दिले असेच लिंगायत लोकही शंभर-दीडशे रुपये जमवून देतो. येथील हायस्कूलमध्ये राहून अभ्यास पुरा करावा असे सांगितले.

मि. दिवाण हे ही फारच दयाळू दिसले. तुमची लॉजींगची वगैरे व्यवस्था करतो म्हणून त्यांनीही वचन दिले आहे. परंतु इन्फ्युइंजाने आजारी पडल्यामुळे काही तात्काळ करता आले नाही. तशात मला त्या रोगाने पछाडल्यामुळे मातोश्री व काका यांचे बरोबर बुधवार ता. २।१०।१८ रोजी निघून पाच्छापूर येथे शुक्रवार रोजी सुखरुप पण आजारीच पोहोचलो. ति. यल्लप्पा (तिंबा) दादा यांनीही बरीच खटपट केली.

त्याचे मालक आनंदराव सबल यानी कृपाळू होऊन काम वगैरे काही न लावता तुमचा अभ्यास सांभाळा असे सांगून आठवड्यास दोन रुपये देत होते. त्याचे फार उपकार झाले आहे. आणखी काही सभ्य गृहस्थ मदत करतो म्हणून वचन दिले आहे. पाच्छापूर येथे येऊन दिवसाआड ताप थंडीने आजारी पडतो, बराच अशक्त झालो. हा, साधारणपणे बरे वाटत आहे. पुढे ईश्वर मर्जी. जतेला सुद्धा हा रोग सुरू असल्याचे समजते. त्या रोगाने सबंध मुंबई इलाख्याभर घेरल्याचे दिसते. प्लेगापेक्षाही फारच उग्र दिसत आहे. शुक्रवार ता. २७।९।१८ पासून ताप सुरू.

(ता. १७-१०-१८)

पाच्छापुराहून शनिवार ता. १९।१०।१८ रोजी जतेस आलो सिंधी अथवा दारू प्याल्याने बरे वाटते असे लोकांने सांगितल्यामुळे एक दिवशी सिंधी घेतली तेव्हा पुन्हा पडसे व अंग दुखून आजारी पडलो. आज साधारण बरे वाटत आहे. पण ऊर भरला आहे. खोखला आहे.

(ता. २६-१०-१८ शनिवार जत)

अनुक्रमणिका

मातोश्रीस लुगडे नसल्यामुळे आणि काही अडचणीमुळे जत येथील महार शाळेवर बदली मास्तरचे काम ता. १।१२।१८ पासून ता. ८।१।१९ पर्यंत करून गुरुवारी ९।१।१९ रोजी निघून ता. १०।१।१९ ला कोल्हापूरला पोहोचला. येथ आल्यावर रा. शिंगे मास्तर, रमाकांत कांबळे व हिरोजी भोसले यांचेकडे जाणे येणे केल्यामुळे आणि तशांत बोर्डींगातील बोर्डर तुकाराम माधव हा न विचारता गेल्यामुळे त्याला मीच शिकवून पाठवून दिले असा रा. 'निंगप्पा शंकर ऐदाळे' याचा समज झाला.

अगोदरच रा. ऐदाळे याचा तेरदाळ मुक्कामी असताना त्याचा चुलत बंधु गोविंद यास विष घालून मारल्याच्या आरोपामुळे मी एक चरचरीत पत्र लिहीले म्हणून माझ्यावर राग होता.

गोविंद हा क्षयाने मेला असून माझ्यावर विनाकारण आग पाखडण्याचा उपक्रम केला त्याचा मलाही राग आला आहे. एकूण दोघामध्ये बेबनाव असल्यामुळे माझे नुकसान करण्याचे हेतूने म्हणा अगर आपले रक्षण करण्याचे हेतूने म्हणा. लिव्हींग सर्टि. निंगाप्पाने अडथळा केला. केवळ त्याचे गुरू रामप्पा यास तुम्ही दारू व मांस का खाता म्हणून वादविवाद केला म्हणून इतका वाईट परिणाम झाला. पण रा. निगप्पा यास आमचे बोर्डिगाचे सुपरि. नेमण्याचे कामी मी स्वतः किती तरी श्रम केले होते. त्याची जाणीव असताना मुद्दामच त्रास देणे, गैर आहे असे वाटले रा. दत्ताजी पवार चांभार या मित्राने आम्हा दोघामध्ये ऐक्य घडबून आणीले. आणि गुरुवर्य सावंत याचे पत्रावरून सर्टि. मिळवून दिले म्हणून रा. पवार याचा मी आभारी आहे. त्याचप्रमाणे रा. शिंगे व नाना मांग (हवालदार) यानी दोन दोन रुपये देऊन गाडी खर्चाची सोय केली. याबद्दल त्याचाही आभारी आहे. सगळ्यास चांगला होऊन चाललो आहे.

(ता. २३-१-१९१९ कोल्हापूर)

बेळगावास २०।२१ दिवस राहून काम करून १० रु. मिळविले. नंतर धारवाडास आलो. विजापूरास वचन दिले होते म्हणून विजापूरास गेलो. आठ दिवस राहून पाहिलें पण लवकर सोय होईना. तेव्हा शिमग्यानिमित्त जतेस गेलो रा. गोखले मुन्सक यांची भेट घेतली. त्यानी एक सर्टि. देऊन, एक रुपयाही दिला त्या सर्टि. वरूनच श्रीमंत आबासो डफळे सरकार यानी कृपाळू होऊन दरमहा ५ रु. प्रमाणे एक वर्षाच्या मुदतीचे स्कॉलरशिपही मार्च १९१९ पासून सुरू केली आहे. त्या बद्दल मी त्याचा आभारी आहे. त्यानंतर रा. मावसभाऊ जीवनादादा याच्या पत्रावरून लगेच विजापूराहून तेथील लोकांची भेट न घेता थेट धारवाडास निघून आलो. शिमगा झाल्यावर बुधवार ता. १९।३।१९ रोजी निघून शुक्रवार ता. २१।३।१९१९ रोजी एथे रात्री येऊन पोहोचलो. नंतर गुरुवार ता. २५।३।१९१९ रोजी धारवाड हायस्कूलमध्ये नाव दाखल केले

(ता. १२।४।१९१९)

मे. चंदावरकर मास्तर याची बेळगावास वर्ग झाला. त्याची जागी मे. हुनगुंद हे आले. त्याची भिती होती पण कृपाळू होऊन आमची इथे मुसलमान यांच्या वक्तबात जेवणाची व्यवस्था केली. प्रत्येकी ८॥ रुपये पडले.

(ता. ४-१२-१९१९)

अनुक्रमणिका

शाळेत जाण्या-येण्याचा बराच त्रास होऊ लागला. शाळेपासून हेडक्कार्टर्स सुमारे दोन मैल आहे. राहणेस खोलीही चांगली मिलेनासी झाली. म्हणून हेडमास्तर चंदावरकर यांचेकडे अर्ज केला. त्यांनी कृपाळू होऊन मला व रा. मेघाजी भारमाजी कांबळे यांना होस्टेल क्कार्टर्स मध्ये एक खोली दिली आहे. बोर्डिंगात फुकट जेवणाची सोय नसल्याने मुलांच्या खर्चाने जेवण दिले जात असे. आम्हाला तसे करता आले नाही. खोलीचे भाडे वगैरे काही देण्याचे नाही. डिप्रेसस्ड क्लासेस मिशन धारवाड शाखेचे सेक्रेटरी मे. चंदावरकर वकील यांनी व हुबळी शाखेचे मे. पटवर्धन यांनी कृपाळू होऊन आम्हा उभयतांस दरमहा स्कॉलरशिप म्हणून १० रु. देत आहेत. जुलै १९१९ पासून सुरू आहे. शिवाय मे. चंदावरकर यांनी खाजगी वर्गणी करून मला ८ रु. मदत केली. त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. हॉस्टेलचे सुपरिटेंडेंट मे. गोखले यानीही आमच्यासाठी श्रम घेऊन चालू महिन्यासाठी मुलांकडून २॥ रु. जमवून आम्हास दिले. फार आभारी आहोत. येथील लिंगायत लोकानीही १०-११ रु. मदत केली म्हणून त्यांचाही आभारी आहे. आता त्यांच्यात भांडत बसण्यात काही अर्थ नाही असे मला वाटत आहे. गोडी गुलाबीने वागून पण हक्कास बाध येत असल्यास साधारण प्रतिकार करून राष्ट्रहित साधले पाहिजे, आणि आपल्या समाजाला वर आणले पाहिजे. असे माझे मत झाले आहे, पाहू काय होते ते.

हेडक्कॉर्टर्सला जाऊन जेवून येण्यात वेळ जात असल्यामुळे रा. कांबळेसह हातानेच येथील ट्रेनींग कॉलेजमध्ये असलेला आपल्या जातीचा विजापूर जिल्ह्यातील बेंबनूरचा रा. काळाप्पा हुसनापा यांस दिलेल्या खोलीत स्वयंपाक करीत आहे. सांबार व भात मिळत असल्यामुळे थोडे सोपे जात आहे. तिघेजण मिळूनच जेवीत असतो.

डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे जनरल सेक्रेटरी गु. शिंदे यांची भेट हुबळी येथे झाली. अभ्यास चांगला करून शिक्षणक्रम लवकर आटोपण्याबद्दल कळकळीने उपदेश केला. ता. २।११।१९ रोजी हुबळी येथे त्यांनी दिलेल्या व्याख्यानाने आणि ता. ३ रोजी धारवाड येथील व्याख्याने खरोखर ऐकून मला आनंद झाला. कुणाशी तंटा अगर शिवीगाळ न करता आम्हा लोकांची अस्पृश्यता घालवून समाजात मिसळण्याची त्यांची सौम्य पण उदार अशी चळवळ प्रशंसनीय आहे. सुधारणेच्छु उदार आणि कर्तुत्ववान पुरुषांच्या सहाय्याने त्यांनी जे मिशनच्या तर्फे शिक्षण अस्पृश्यता आणि राजकीय हक्का बदलचे प्रयत्न चालविले आहेत. त्याबद्दल आम्ही सदैव आभारी ऋणी आहो. विहिरी व धर्मशाळा यामध्ये आम्हा लोकास मोकळीक असावी अशा बद्दलचे ना. बेळवी याच्या ठरावास विरोध करणाऱ्या नामदाराचा या सभातून त्यांनी केलेला तीव्र आणि झणझणीत निषेध लक्षात घेता खरोखरच आमच्या हितासाठी केवळ झटताहेत अशी मनाची खात्री होऊन जाते.

(धारवाड ता. ६-९-१९)

बहीण साऊबाई व मेहुणा गुराप्पा उभयता आज आली व आक्रोश करू लागली. हे बघून मला रडे आले व अगदीच वाईट वाटू लागले आहे.

(ता. २१-१-१९१७)

अनुक्रमणिका

माझ्या कार्याला एक मात्र अडथळा झाला आहे. तो हा की, मातुःश्रीच्या पोषणाची पंचाईत झाली आहे. आता पुढे काय करावे हे काही समजत नाही मोठा पर्वतच आडवा पडला आहे. यातूनच जाण्याची शक्ति देवा तूच दे.

(ता. २२-१-१९१७ इ)

अजून जतेस पटकी सुरू आहे. मी पाछापूरास आलो आहे.

(ता. २३-१-१९१७)

बेळगाव डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड ऑफिसांत वीस रुपयाची नोकरी मिळाली. त्यापूर्वी सौ. तारा व मी महारवाड्यात पण दुसऱ्यांच्या येथे सर्व गैरसोय व कमीपणा वाटू लागला. ता. १७।१।१९२४ कामावर हजर झालो.

१) पुना जाईन होणेबद्दल खटपट. वकीलाचा अभ्यास होईना. बेळगावास क्लासला घेईनात रा. माणगांवकर यांनी पूर्वी वचन दिले होते पण नंतर खाजगी घराची सबब पुढे केली व घेण्याचे नाकारले. नामदार भास्करराव जाधव यास पानसुपारी दिली.

२) मी आनंदराव मुठकर व मे. वामनराव देसाई यांनी बी. ए. होण्याबद्दल उपदेश केला.

३) आठ महिन्याची रजा घेतली व रविवार ता. २३ जूनला सौ. तारास बेळगाव सोडून एकटाच आलो. नाव घातले. नंतर सौ. तारास घेऊन यावे म्हणून बेळगावस गेलो तो आई साऊबाई व चिरंजीव तमु-

१) फार्म मिळाला नाही, व त्याचे कारणे.

२) पोलिस सुपरिटेंडेंट यांच्या ऑफिसात एक महिना काम केले

३) जतेस गेलो. बायकोस नवसाचे म्हणजे घरभरणी केली.

४) कोल्हापुरास व वकीलाची सनद मिळाली. (जुलै १९२०) नागपूर, मुंबई हुबळी जावे इच्छा, काही पैसे मिळाले. पुढे जतेला गेलो कुटुंबास आणखी पंधरा रुपये दिले.

५) कोल्हापुरी नोकरी मास्तराचे काम केले, अमेरिकेस जाण्याची खटपट. बेळगावास नोकरी धरली. आईस व कुटुंबास पाठविले. नाव तारा असे ठेविले.

६) नौकरी सुटली. अभ्यास करण्याचा निश्चय सौ. ताराचा पाठबळ मदत Hely.

७) साऊबाईची दोन मुले वारली व सौ. तारा अजारु म्हणून गावी गेली.

अनुक्रमणिका

८) बेळगावास आलो पण प्लेग सुरु तेव्हा पुन्हा जतेला गेलो. नंतर शिरनांदगीस राहिलो, सोलापूरास गेलो त्यापूर्वी जतेस नौकरी धरण्याबद्दल खटपट सौ. तारा गरोधर राहिली.

९) पुण्यास गेलो. कोल्हापुरास आलो.

१०) बेळगावला आलो, अभ्यास केला, फार्म मिळाला परिक्षा पास.

११) एप्रीलमध्ये जतेस व शिरनांदगास गेलो. सौ. तारा बाळंत झाली मुलगा झाला पण लगेच मेला. मुल सुंदर होते. सौ. तारास घेऊन धारवाडास कॉलेजमध्ये जाण्याचा निश्चय.

१२) कॉलेजमध्ये गव्हर्नमेन्ट स्कालरशिप मिळाली, फ्रिशिप मिळाली.

१३) वकीली करण्याच्या इराद्याने हायकोर्ट वकीलीची परिक्षा द्यावी. असे मनात आले म्हणून डॉ. आंबेडकरांचा सल्ला घेतला व कुठेतरी नोकरी धरून अभ्यास करावा म्हटले. मुंबईस जाण्याची इच्छा पण निरुत्साह झाली.

१४) सौ. तारा हीस गुंडीमामा शिरनांदगीस घेऊन गेले, करमेनासे झाले म्हणून व जेवणाची गैरसोय होऊ लागली म्हणून कॉलेज सोडून तिकडे गेलो. आठ दिवसात यावे म्हटले पण येणे झाले नाही. मी तिकडे चार महिने राहिलो नंतर नोकरीसाठी खटपट केली.

मे. चंदावरकर मास्तर यांचा बेळगावला वर्ग झाला त्याचे जागी मे. हुनगुंद हे आले. त्यांची भीति होती पण कृपाळू होऊन आमची येथे मुसलमान यांच्या क्लबात जेवणाची सोय केली प्रत्येकी ८॥ रुपये.

(ता. ४-१२-१९)

दिवशी म्हणजे शनिवारी आले. रविवार संध्याकाळच्या गाडीने आलो.

सौ. तारा बाळंत झाली, मुलगा झाला आहे. नाव भास्कर असे ठेविले आहे. जन्म ता.

सहामाहीची परिक्षा झाली. नापास झालो. खर्चाची फार अडचण मे. वामनराव देसाई व रा. सा. नायडू यांची मदत वेळेवर येत नाही आणि गव्हर्नमेंट स्कॉलरशिपही तीन महिन्यानी मिळते म्हणून खर्चाची अत्यंत तारांबळ.

―――――

अनुक्रमणिका